दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ७ वे अंक -२७ | सोमवार दि.०५ ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-7th | Issue- 27 | Monday, Dt.05 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# ज्ञानेश कुमार चले जाव

मुंबई : प्रतिनिधी

एसआयआरच्या नावाखाली राज्यातील जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात १३ कोटी मतदारांची नावं यादीतून वगळली आहेत. भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारण्याचा अधिकार कोणालाही नाही. देशाच्या सीमा तुमच्या हातात आहेत. मग बांगलादेशी भारतात, महाराष्ट्रात येतोच कसा, एसआयआरमधून किती बांगलादेशी पकडले, असा सवाल करत बांगलादेशींच्या नावाखाली देशातील नागरिकांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला जात असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. यंत्रणांना हाताशी धरून कोणी हुकुमशाह होत असेल तर ही हुकूमशाही गाडून टाकू, असा इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी, मेट्रो सिनेमा ते मुंबई महानगरपालिकेपर्यंत गर्जना मोर्चा काढण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर या मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. या मोर्चात शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सांवत, आमदार ॲड. अनिल परब, भास्कर जाधव, शिवसेना नेते सुभाष देसाई, माजी खासदार चंद्रकांत खैरे, प्रवक्त्या सुषमा अंधारे, मनसे नेते बाळा नांदगावकर, अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, शेकापचे जयंत पाटील आदी नेतेमंडळी उपस्थित होते. कोणताही राजकीय झेंडा न घेता सर्व कार्यकर्ते व तरुणाईंनी तिरंगा हातात घेऊन मोर्चात सहभागी झाले होते.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार



यांच्याविरोधात ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली आज सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. महापालिकेसमोर या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी बोलताना शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर, मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणावर आणि केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली. आमचा लढा कोणत्याही एका पक्षाचा, व्यक्तीचा, जात-पात किंवा धर्माचा नाही. हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीच्या रक्षणाचा लढा आहे. मोदीजी जेव्हा पहिल्यांदाच पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांनी मेक इन इंडियाची घोषणा दिली होती. आम्हाला ती मान्य आहे; मात्र मेक इन इंडियाच्या नावाखाली आपल्या देशात हुकूमशाही बनणार असेल, तर त्यांना याच देशात गाडून टाकण्यासाठी आम्ही उभे राहिले आहोत.

देशभरातील मतदारांची नावे वगळल्याचा आरोप करत निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर ठाकरेंनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात १३ कोटी मतदार वगळले आहेत. म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राच्या लोकसंख्येएवढ्या लोकांना मतदार यादीतून बाहेर काढले गेले. भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारण्याचा प्रकार आहे, असे ठाकरे म्हणाले. गृहमंत्री अमित शहा निवडणूक आयोगाच्या मदतीने लोकांचे नागरिकत्व काढून घेत आहेत. हिटलर हुकूमशाह होता आणि तो कुणालाच घाबरत नव्हता. मात्र, अशी वेळ आली की त्याला स्वत:वरच गोळी झाडून घ्यावी लागली. त्याच्यानंतर त्याला मदत करणा-यांना काय काय भोगावे लागले, हे सर्वांनी लक्षात ठेवावे, असा सूचक इशारा उद्धव ठाकरे यांनी प्रशासनातील लोकांना दिला.

## जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी

## शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध - पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे





बीड ।प्रतिनिधी

यावर्षी पावसाने ओढ दिल्यामुळे बीड जिल्ह्यातील अकराही तालुक्यांवर दुष्काळाचे संकट ओढवले आहे. पावसाच्या अभावामुळे शेतकऱ्यांची उभी पिके करपली असून हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या पार्श्वभूमीवर,पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील विविध दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांनी बीड

पान २ वर...

## राष्ट्रवादी काँग्रेस महिला काँग्रेसच्या बीड शहराध्यक्षपदी राणी शेख गुलरुख जहीन यांची नियुक्ती



बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी महिला काँग्रेस (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने बीड शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी शेख राणी गुलरुख जहीन, शेख किश्वरुद्दीन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष अँड. रोहिणी एकनाथराव खडसे यांनी दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्षा व महासंसदरत्न खा. सुप्रियाताई

पान २ वर...

## जलजीवन मिशनचे काम चार वर्षांपासून रखडले

हर घर जल
जल जीवन मिशन

### हनुमंत घाडगे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील सातेफळवाडी,घाडगे वस्ती तसेच ढोराळे वस्ती येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना

पान २ वर...

## नुतन कॉलनीत बंद घर फोडून रोकड सोन्याचे दागिने लंपास

### १ लाख ५० हजारांची रोकड २६ लाखांच्या एफडीचे फॉर्मही चोरीला

भोकरदन इसरारखान पठाण :- शहरातील नुतन कॉलनी परिसरात बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोकड व सोन्याचे दागिने असा सुमारे ३ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, विविध बँकांमधील तब्बल २६ लाख रुपयांच्या मुदत ठेवींचे एफडी फॉर्मही चोरट्यांनी नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी राधा कृष्णा फुलमाळी वय ४५ व्यवसाय घरकाम व शेती रा. नुतन कॉलनी भोकरदन यांनी भोकरदन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० ते ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान फुलमाळी यांचे




चोरांचा “स्मार्ट” डल्ला: सोनं-नाणं तर नेलंच, पण २६ लाखांचे 'एफडी फॉर्म्स' पळवून चोर झाले रातोरात “श्रीमंत” आणि...पोलिसांचा तपास सुरू!

घर बंद होते. ही संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप उचकटून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील रोकड सोन्याचे दागिने आणि बँकेचे एफडी फॉर्म चोरून नेले.

चोरीला गेलेल्या ऐवजात १ लाख ५० हजार

पान २ वर...

## डॉं.माऊली हॉंस्पिटल मध्ये भगवान साळवे यांचा मृत्यू

### निष्काळजीपणा झाला नातेवाईकांचे मत

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव येथे माऊली हॉंस्पिटल मध्ये भगवान साळवे केसापुरी कॅंप यांचा मृत्यू झाला.भगवान साळवे हे दोन दिवसांपासून रूग्णालयात उपचार घेत होते.उपचारात डॉं डाके यांनी हालगर्जीपणा केला असे मत रूग्णाच्या नातेवाईकांनी मांडले.तर डॉंक्टर डाके यांना विचारले असता ,आपण रूग्णांची वेळोवेळी काळजी घेतली असे सांगितले.तसेच बोललेल्या पाच मिनिटांत मी पेशंट यांच्या जवळ पोहचलो असे डॉंक्टर यांचे मत आहे.रात्री अकरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती.अघाप माजलगाव

पान २ वर...

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी बाजीराव दादा चव्हाण

### दुष्काळग्रस्त भागात मोफत पिण्याच्या पाण्याचे वाटप; घाबरू नका, युवासेना कायम तुमच्या पाठीशी



बीड ।प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न उभा राहत आहे. अनेक ठिकाणी पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून, या परिस्थितीत सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी युवासेनेच्या वतीने मोफत पिण्याचे पाणी वाटपाचा उपक्रम सुरू करण्यात येत आहे. रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ पासून या उपक्रमाला सुरुवात होणार असून, दुष्काळग्रस्त नागरिकांना आवश्यकतेनुसार मोफत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पाण्यासारख्या अत्यावश्यक विषयावर पुढाकार घेत युवा सेनेने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे.

पान २ वर...

## महात्मा गांधी- लालबहादूर शास्त्रींच्या विचारांना कृतीची आदरांजली

### जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात स्वच्छता अभियान,





बीड । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती, भारतरत्न माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री जयंती, राष्ट्रीय स्वच्छता दिन तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गटाच्या) माजी आमदार व ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. उषाताई मोतीराम दराडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांना केवळ अभिवादन न करता प्रत्यक्ष कृतीतून आदरांजली वाहण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

२ ऑक्टोंबर रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबई यांच्या संयुक्त

पान २ वर...



बीड - राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टीच्या माजी आमदार ज्येष्ठ विधीज्ञ अँड. उषाताई दराडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि लोकजगतच्या संपादक शेख आयेशा यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ अँड मोतीराम बापू दराडे उपस्थित होते.

## संपादकीय....

# दुष्काळावर रोजगाराच्या हमीचा उतारा

राजयोग / संपादकीय

यावर्षी सातत्याने ज्याची चर्चा सर्वत्र होतेय त्या अल निनोने आपला प्रताप दाखवायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्राच्या अनेक तालुक्यात सरासरीच्या पन्नास टक्क्यांच्या आसपास पाऊस झालेला दिसत आहे. सोयाबीन, उडीद अशी खरीपाची पिकं पावसाअभावी जळून गेलीत. रब्बीच्या पेरण्या होण्याची शक्यता अजिबात नाहीये. ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात अल निनो स्थिती अधिक मजबूत असेल असा अंदाज आहे. उन्हाचा जो तडाखा सप्टेंबर महिन्याच्या मध्यापासून अनुभवायला मिळतोय त्याने अल निनोच्या मजबूत स्थितीची प्रचिती येतेय. यावर्षी हिवाळा फारसा जाणवणार नाही असाही अंदाज आहे. सध्याच्या तीव्र उन्हाने जमिनीतील उरली सुरली ओलही बाष्पीभवन होऊन संपून जाईल. अनेक गावामध्ये आत्ताच टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. २०२७ येईपर्यंत गंभीर अशा पाणी टंचाईचा आणि चारा टंचाईचा सामना महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागाला करावा लागणार आहे. अशा परिस्थितीत जिथे कुठे पाणी उपलब्ध आहे तिथे ते अतिशय काटकसरीने वापरून वाचलेलं पाणी दुष्काळी भागातील माणसे आणि जनावरे यांना पिण्यासाठी राखून ठेवलं पाहिजे. कितीही लांब अंतरावर पाण्याची वाहतूक करावी लागली तरी ती करण्याची तयारी प्रशासनाला ठेवावी लागेल. पाणी वापराबाबत काही कठोर निर्णय करण्याची गरज आहे. अत्यावश्यक नसलेले आणि पाण्याचा खूप वापर करणारे उद्योग बंद ठेवावे लागले तर ती ही तयारी ठेवायला हवी. जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता कशी आणि कोठून करायची हे एक मोठे आव्हान असणार आहे. २०१९ सालच्या आणि त्याआधी २०१३ साली ही, दुष्काळी परिस्थितीत पाण्याअभावी सुकत चाललेला शेतकऱ्यांचा ऊस शासनाने खरेदी करून चारा म्हणून उपलब्ध केला होता, तो एक पर्याय असेल. सह्याद्रीच्या घाटरांगामध्ये बऱ्यापैकी पाऊस झाला आहे. तिथे वाढणाऱ्या गवताकडे एरवी कोणाचे लक्ष जात नाही, पण यावर्षी आत्ताच ते कापून साठवलं तर चारा म्हणून ते उपयोगी पडू शकतं. पिण्याचं पाणी राखून ठेवल्यावर जे थोडंफार पाणी उरेल तिथे चारा उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन योजना राबवता येईल. जनावरांचं कोरडं खाद्य बाहेर देशातून मागवण्याचा पर्याय ही तपासून बघायला हवा. एक मात्र नक्की की दुष्काळी भागात चारा आणि पाण्याच्या टंचाई निवारणासाठी शासनाकडून धाडसी आणि तातडीच्या उपाययोजना अपेक्षित आहेत.

ग्रामीण भागात फिरताना वयस्कर लोक १९७२ सालातील दुष्काळाच्या आठवणी जागवत आहेत. त्यावेळीही पावसाअभावी पिकं सगळी सुकून गेली होती. मात्र भुगर्भातील पाणी पातळी आजच्या सारखी गंभीररित्या खालावलेली नव्हती. १९७२ च्या दुष्काळात अन्नधान्याची मात्र तीव्र टंचाई होती. अमेरिकेच्या पीएल ८० कायद्याद्वारे तिकडून मागवलेल्या गव्हावर आपली सगळी भिस्त होती. रेशनवरून मिळणाऱ्या त्या गव्हामुळे माणसं कशीबशी जगली. जनावरांचे मात्र खूप हाल झाले. जिवापाड सांभाळलेल्या जित्राबाला अनेक कास्तकारांनी डोळे पुसत बाजार दाखवला. शेतकऱ्यांचा बैल बारदाना त्या दुष्काळात जो मोडून पडला तो पुन्हा उभारायला बरीच वर्षे गेली.

महाराष्ट्र शासनाने १९७२ च्या दुष्काळात दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी फार चांगल्या पद्धतीने रोजगार हमी योजना राबवली. ग्रामीण भागातून रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी त्याचा बऱ्याच प्रमाणात उपयोग झाला. अठरा वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापतीपद ज्यांनी सांभाळले त्या दिवंगत वि स पागे सरांना महाराष्ट्राच्या ग्रामीण रोजगार हमी योजनेचे जनक मानले जाते. समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांनीही याकामी महत्वाच्या सूचना केल्या होत्या. सातत्याने आढावा घेऊन सुधारणा करण्याची व्यवस्था असलेला हा कायदा त्यानंतर अनेक राज्यांनी स्वीकारला आणि शेवटी केंद्र सरकारने ही स्वीकारला व त्याला मनरेगा असे नाव दिले. महाराष्ट्राच्या कायद्यावर संयुक्त राष्ट्र संघात महत्वपूर्ण चर्चा झाली. त्यामुळे आफ्रिकेतील काही देशात भुकबळी रोखण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार त्यावर अंमलबजावणी झाली.

१९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेच्या कामातून पाझर तलाव, (नाला बंडिंग), तळी, शेतजमिनीची बांधबंदिस्ती, छोट्या छोट्या गावांना जोडणारे रस्ते अशी अनेक उत्पादक कामे झाली. नंतरच्या पावसाळ्यात पावसाचं पाणी भुगर्भात मुरायला उपयोगी पडतील अशी ती कामे होती. त्या कामांचा तसा उपयोग पुढील काही वर्षे झालाही. गावाच्या किंवा वस्तीच्या जवळ काम आणि काम करणाऱ्या मजुरांना कामाच्या बदल्यात मजुरीसोबतच धान्य हे या योजनेचे वैशिष्ट्य होते. याशिवाय दर शनिवारी मजुरीसोबत सुकडी नावाचा गोड खाऊ त्यावेळी मिळायचा. रवा किंवा मक्याचा भरडा भाजून गूळ घातलेली कोरडी सुकडी चविष्ट असायची. मी स्वतः त्या सुकडीची चव चाखलेली आहे. बाबा आढाव, पन्नालाल सुराणा, दत्ता देशमुख, एन डी पाटील भाई उद्धवराव पाटील अशा महाराष्ट्रातील डाव्या आणि समाजवादी चळवळीतील दिग्गज नेत्यांच्या नेतृत्वात त्या काळात ठिकठिकाणी निगराणी समित्या तयार झाल्या होत्या. रोजगार हमी योजनेची कामे सुरू व्हावीत, कामाची मजुरी वेळेवर मिळावी, योजना पारदर्शक पद्धतीने राबवली जावी यासाठी या निगराणी यंत्रणेने प्रभावी काम केले होते.

महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून नोकरदार वर्गाला व्यवसाय कर (प्रोफेशनल टॅक्स) लागू करणारा कायदा याच काळात आला. व्यवसाय करातून जमा होणारा निधी ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठीच वापरला जाईल अशी स्पष्ट तरतूद त्यात होती. पुढे केंद्र सरकारने काही बदलासह ही योजना स्वीकारली आणि त्याला मनरेगा असे नाव दिले. आताच्या सरकारने कामाच्या हमीला कमजोर करणाऱ्या सुधारणा करून त्याला विकसित भारत – जी रामजी असे नाव दिले आहे. महाराष्ट्र सरकारनेही मधल्या काळात रोजगार हमी योजनेसाठी व्यवसाय करातून मिळणारा निधी शेतीतील अन्य कामासाठी वापरता येईल अशी दुरुस्ती केलेली आहे.

यावर्षी रोजगाराची स्थिती बिकट आहे. आज रोजी शेतात रोजगार उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांच्या सोबतच शेतमजूर आणि शेतीवर अवलंबून असलेले कारागीर समुह अडचणीत आले आहेत. महाराष्ट्र शासनाने मोठया प्रमाणावर रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू करण्याची गरज आहे. रोजगार हमी योजनेवर काम करण्यास मजूर उत्सुक नाहीत असे चित्र प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी उभे केले आहे मात्र ते चित्र फसवे आहे. मजुरी कमी असणे, मजुरी महागाईशी सुसंगत नसणे, जी आहे ती मजुरी सुद्धा वेळेवर न मिळणे, कामांच्या मंजुरीची प्रक्रिया किचकट असणे, ती प्रक्रिया विकेंद्रित आणि स्थानिक परिस्थितीला पुरक अशी नसणे, त्यामुळे गावाच्या म्हणजेच वस्तीच्या जवळ कामे काढण्याचं बंधन पाळले न जाणे अशा काही कारणामुळे रोजगार हमी योजनेच्या कामांना मजुरांचा प्रतिसाद कमी आहे असे वाटू शकते. पण वरील त्रुटी जर दूर केल्या तर रोजगार हमी योजनेच्या कामांना निश्चित प्रतिसाद मिळेल.

अल निनो स्थितीने आज आपल्यासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. मात्र आपण एकजुटीने त्याचा मुकाबला केला पाहिजे. आपल्यातील कोणीही हताश, निराश होऊन मानसिकदृष्ट्या खचणार नाही यासाठी एकमेकाशी बोलले पाहिजे. एकमेकाला धीर देत पुढचा मार्ग शोधायला मदत केली पाहिजे. सरकारने आधी २६५ आणि नंतर १९ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. मात्र त्यातील मदतीचे स्वरूप फारच तोकडे आहे. भरीव अशा पीक नुकसान भरपाईबद्दल सरकारने अद्याप भूमिका घेतलेली दिसत नाही. पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता कशी होणार हे चित्र अद्याप स्पष्ट नाही. तातडीच्या उपाययोजनांसाठी विरोधी पक्ष आणि सत्तापक्षातील संवाद वाढण्याची गरज आहे. आपण जनसंघटना म्हणून संघर्ष आणि संवादाच्या मार्गाने शासनाशी समन्वय साधत प्रशासन गतिमान आणि लोकाभिमुख बनेल असा प्रयत्न करूया. येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवर यशस्वीपणे मात करतानाच भविष्याची आखणी करूया.

पान १ वरून..

**शेतकरी बांधवांना....**

तालुक्यातील वंजारवाडी, काकडहिरा, मुर्शदपूर, लिबांदेवी तसेच पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी नायगाव, रोहतवाडी, तांबा राजुरी, तळे पिंपळगाव, करंजवण आदी गावांमधील शेतशिवारात प्रत्यक्ष जात पिकांच्या नुकसानीचा आढावा घेतला.

या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या व्यथा व अडचणी जाणून घेतल्या. या कठीण काळात शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. इतिहासात पहिल्यांदाच केंद्र आणि राज्याचे पारंपरिक निकष बाजूला सारून शासनाने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे. प्रशासकीय यंत्रणेला पिकांच्या नुकसानीचे व पंचनाम्याचे काम अचूक आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तोंडावर आलेला सण पाहता, शासनाकडून शेतकऱ्यांच्या संकटांची तीव्रता कमी करण्यासाठी आणि त्यांची दिवाळी गोड करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. तसेच ३२ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी असो वा इतर मदत, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाच्या या संवेदनशील भूमिकेमुळे शेतकरी वर्गाला मोठा आधार मिळाला असून, प्रशासनाकडून मदतीची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू असल्याचेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

**नुतन कॉलनीत....**

रुपये रोख ८० हजार रुपये किमतीची दोन तोळ्यांची सोन्याची चैन ६० हजार रुपयांचे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठन ४० हजार रुपयांचे एक तोळ्याचे मिनी गंठन ३२ हजार रुपये किमतीचे आठ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुंबर आणि ३५ हजार रुपये किमतीच्या पाच ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्यांचा समावेश आहे.

याशिवाय गणपती बँकेचे १४ लाख महाराष्ट्र बँकेचे सहा लाख आणि मराठवाडा अर्बन बँकेचे सहा लाख रुपये अशा एकूण २६ लाख रुपयांच्या एफडीचे फॉर्म चोरट्यांनी लंपास केले आहेत. रोख रक्कम व दागिन्यांची एकूण किंमत ३ लाख ९७ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भोकरदन पोलिस ठाण्यात गु.र.नं. ५३४/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३३१(४) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा ४ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३४ वाजता दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन कटेकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष द. माने आणि पोलिस उपनिरीक्षक शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तपासादरम्यान ई–साक्ष प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.बंद घराची पाहणी करून चोरट्यांनी नेमका कसा प्रवेश केला यासह परिसरातील हालचालींचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. या घटनेनंतर नुतन कॉलनीसह शहरातील नागरिकांनी घर बंद ठेवताना विशेष खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

**महात्मा गांधी– ....**

विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. परिसरातील स्वच्छता करून स्वच्छता, सेवा आणि सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला. बेघर निवारा केंद्रातील नागरिकांप्रती आपुलकीची भावना व्यक्त करत त्यांच्या परिसराची स्वच्छता करण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठीही प्रेरणादायी ठरला.

हा उपक्रम पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडियाचे नूतन जिल्हाध्यक्ष बालाजी जगतकर व महिला जिल्हाध्यक्ष आरती परळकर यांच्या पुढाकारातून संपन्न झाला.

यावेळी सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या राणी शेख , हिना शेख, मंगलताई जगताप,स्नेहल खंडागळे, शांतीप्रिया गवळी, दत्तात्रेय सौंदरमन, अरुण खेमाडे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापिका छाया हिरवेसह पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य, डिजिटल मीडिया संघटनेचे पदाधिकारी, विविध पक्षांतील मान्यवर, विधीज्ञ तसेच ॲड. उषाताई दराडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या महिला, नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला केवळ आरोग्याचा विषय न मानता ती सामाजिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले होते. त्याच विचारांचा जागर करत राष्ट्रीय स्वच्छता दिन प्रत्यक्ष श्रमदानातून साजरा करण्यात आला. तर लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेच्या विचारांचीही यावेळी आठवण करण्यात आली.

वाढदिवसाला केवळ शुभेच्छांचा वर्षाव न करता सामाजिक उपक्रमाला प्राधान्य देत ॲड. उषाताई दराडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.'विचार केवळ बोलण्यात नकोत, कृतीत उतरले पाहिजेत'महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांना खरी आदरांजली म्हणजे समाजासाठी प्रत्यक्ष योगदान देणे. स्वच्छता, सेवा आणि माणुसकीचा हा उपक्रम त्याच सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला असे म्हटले तर वावगे ठरू नये.

पान १ वरून..

**जलजीवन मिशनचे ....**

करावा लागत आहे. सातेफळवाडीसाठी जलजीवन मिशन अंतर्गत सन २०२२ मध्ये सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांच्या निधीतून पाणीपुरवठा योजनेचे काम मंजूर करण्यात आले.काम सुरू होऊन चार वर्षे झाले पण अद्याप काम पूर्ण झाले नाही.काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे या मागणी साठी हनुमंत घाडगे यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

याबाबत सातेफळ येथील हनुमंत बळीराम घाडगे यांनी पंचायत समिती,केजच्या गट विकास अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देऊन तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. दरवर्षी दिवाळीनंतर पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी व बोअर अधिग्रहित केले जातात.मात्र एप्रिल–मे महिन्यात अधिग्रहित विहिरींमध्येही पुरेसे पाणी राहत नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते.यावर्षी दुष्काळी परिस्थिती आहे.पावसाचे प्रमाण कमी असल्याने भविष्यातील पाणी टंचाईचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

सातेफळ गाव व घाडगे वस्ती,दोराळे वस्ती यांच्यासाठी जलजीवन योजना मंजूर असूनही ती अद्याप पूर्ण झालेली नाही.त्यामुळे संबंधित कामाच्या ठेकेदारांना आदेश देऊन दोन महिन्यांत प्रत्यक्ष गावाला जलजीवन योजनेचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.काम तातडीने सुरू न झाल्यास आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा हनुमंत घाडगे यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रती तहसील कार्यालय केज,उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई, जिल्हाधिकारी,बीड तसेच ग्रामविकास मंत्री कार्यालयाकडे देण्यात आल्या आहेत.त्यामुळे प्रशासन आता या रखडलेल्या पाणी पुरवठा योजनेबाबत तात्काळ कार्यवाही करून काम पूर्ण करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस महिला...**

सुळे, महिला राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती फौजियाताई खान, आमदार जयंतराव पाटील साहेब तसेच प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बीड विधानसभेचे आमदार संदीप भैया क्षीरसागर, माजी आमदार अँड उषाताई दराडे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही नूतन शहराध्यक्ष शेख राणी यांनी दिली असून पक्ष बळकटीकरणासोबतच पक्षाची ध्येय–धोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले आहे.बीड शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी झालेल्या नियुक्तीबद्दल शेख राणी गुलरुख जहीन यांचे पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला आघाडीच्या वतीने अभिनंदन होत असून, त्यांच्या माध्यमातून बीड शहरात महिला संघटना अधिक सक्षम व गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**डॉ.माऊली हॉस्पिटल ....**

पोलीस स्टेशन मध्ये रात्री अकरा पर्यंत गुन्हा नोंद झाला नव्हता.सगळ्या गोंधळात माऊली हॉस्पिटल मधील इतर पेशंट भयभीत झालेले दिसून येत होते.माऊली हॉस्पिटल मध्ये पेंशटच्या नातेवाईकांनी डॉक्टर,लॅब चालक,डॉक्टरांचा भाऊ यांना मारहाण झाली.हॉस्पिटल मध्ये निष्काळजीपणा होत आहे.असा आरोप पेंशटच्या नातेवाईकांनी केला

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या ....**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब, युवासेना मराठवाडा निरीक्षक तथा लोकसभा प्रमुख बाजीराव दादा चव्हाण साहेब यांच्या मार्गदर्शनातून तसेच युवासेना जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ जाधव आणि बाजीराव दादा मित्र मंडळ यांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. पाण्यासाठी जनतेला वणवण करण्याची वेळ येऊ नये, दुष्काळाच्या काळात शेती, जनावरे आणि रोजगाराच्या प्रश्नांसोबतच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सर्वात महत्त्वाचा ठरतो. ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी दूरवर जावे लागू नये आणि पिण्याच्या पाण्यासाठी कोणत्याही कुटुंबाला अडचणींचा सामना करावा लागू नये, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागातील सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी यांना शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. संकटाच्या काळात केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे येणे, हीच या उपक्रमामागील भूमिका असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. संकट कितीही मोठे असो, जनतेला एकटे सोडणार नाही. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने नागरिकांनी घाबरून जाऊ नये. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यास नागरिकांनी संपर्क साधावा; युवा सेना त्यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, दुष्काळाच्या काळात त्याच्यासमोर अनेक अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करत असताना सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित प्रश्नांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पाणी हा जीवनाचा प्रश्न असल्याने दुष्काळाच्या काळात नागरिकांना आधार देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे, असे आयोजकांनी सांगितले.



# परडा शिवारात शेतातील सोलर पंप व केबल लंपास अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

परडा गणेश पाटोळे :– अंबड तालुक्यातील परडा शिवारातील एका शेतातून अज्ञात चोरट्यांनी सोलर पंप केबल व रशी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार परडा येथील शेतकरी रामनाथ नारायण जऱ्हाड वय ३८ यांची परडा शिवारातील गट क्र. ६१ मध्ये शेती आहे. त्यांनी सुमारे महिन्यापूर्वीच शेतातील बोअरवेलवर ३ एच.पी. क्षमतेची ओसवाल कंपनीची सोलर मोटार बसवली होती.२४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे शेतातील मोटारपंप बंद केला होता. त्यानंतर २५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास ते शेतात मोटार सुरू करण्यासाठी गेले असता, बोअरवेलवरील ३ एच.पी. ओसवाल कंपनीची सोलर मोटार, अंदाजे १०० फूट केबल व रशी गायब असल्याचे दिसून आले. त्यांनी आसपासच्या परिसरात शोध घेतला; मात्र काहीही पत्ता लागला नाही. अज्ञात चोरट्यांनी पाईपचे नट–बोल्ट काढून सोलर मोटार व केबल कापून पळवून नेल्याचे निष्पन्न झाले.या चोरीत सुमारे २० हजार रुपयांचे साहित्य चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी रामनाथ जऱ्हाड यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता डीएनएएस २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल राजाभाऊ वाघमारे करत आहेत.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८००/२०२६**
**घूमाबाई भ्र. बाबु आडे व इतर वि. निरंक**
**मार्फत – ॲड आर. ए. कोळेकर, गेवराई**
**अर्जदार – १. धूमाबाई भ्र. बाबु आडे वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. नरसिंह तांडा, गुळज ता. गेवराई जि. बीड**
**२. डिगांबर पि. बाबुराव आडे वय ३५ वर्षे, धंदा – शेती, रा. नरसिंह तांडा, गुळज ता. गेवराई जि. बीड**
**३. अरुण पि. बाबुराव आडे वय ३२ वर्षे, धंदा – शेती, रा. नरसिंह तांडा, गुळज ता. गेवराई जि. बीड**

ज्याअर्थी मयत बाबु पि. चंदु आडे हे/हया अनुक्रमे दिनांक १८/०६/२०२६ रोजी मौजे गुळज ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे हेला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असंही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन न्याचा एक्क शावीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बाबु पि. चंदु आडे, रा. गुळज ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः १६/११/२०२६

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७६१/२०२६**
**कारभारी पि. साहेबराव बिचकुले व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. एस.ए. दिंडे)**

ज्याअर्थी मयत नामे साहेबराव कारभारी बिचकुले, रा. गोविंदवाडी, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक ०२/०३/२०२३ रोजी गोविंदवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ कारभारी पि. साहेबराव बिचकुले, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. गोविंदवाडी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ अमृत पि. साहेबराव बिचकुले, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. गोविंदवाडी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ शारदा युवराज कोकरे, वय ४८ वर्षे, धंदा शेती रा. कवडगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ४ केसरबाई भ्र. साहेबराव बिचकुले, वय ७५ वर्षे, धंदा शेती रा. गोविंदवाडी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत साहेबराव कारभारी बिचकुले यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – ०५/११/२०२६

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८०१/२०२६**
**सतिष पि. भिवा हराळे व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. के. एल. पिसाळ)**

ज्याअर्थी मयत नामे भिवा तोलाजी हराळे, रा. राजपिंपरी, ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक १०/०९/२०२५ रोजी नवीन थेरगाव हॉस्पीटल पिंपरी चिंचवड हवेरी पुणे ता.जि पुणे येथे मयत झाले /झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ सतिष पि. भिवा हराळे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. राजपिंपरी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ उमाकांत पि. भिवा हराळे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. राजपिंपरी ता. गेवराई जि.बीड ह.मु. गवळी चाळ, काटे नगर, पिंपळे सौदागर, औध कॅम्प पुणे ता.जि पुणे अर्जदार क्र. ३ सोनाली भ्र. प्रकाश भोले, वय ४७ वर्षे, रा. बौध्द नगर, पिंपरी पुणे ता. जि. पुणे, अर्जदार क्र. ४ शशिकलाबाई भ्र. भिवा हराळे, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. राजपिंपरी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय /निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भिवाजी तोलाजी हराळे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – १७/११/२०२६

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७९१/२०२६**
**रघुनाथ पि. किसनराव रुचके व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. व्ही. एस. शिंदे)**

ज्याअर्थी मयत नामे आश्राबाई भ्र. बाजीराव जंगले, रा. भेंड बु., ता. गेवराई जि. बीड हे/हह्या दिनांक २५/०४/२०२० रोजी भेंड बु. ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार लोभा बाजीराव जंगले, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. भेंड बु. ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत आश्राबाई भ्र. बाजीराव जंगले यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – १६/११/२०२६

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहिर प्रगटन**
**बीड येथील श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दि अर्ज क. ७८७/२०२६**
**सखाराम व इतर वि. निरंक**
**ॲड. रूईकर पी.पी.**

अर्जदार

१.सखाराम पिता धोंडीबा ससाणे, वय ६१ वर्षे, धंदा शेती रा. रूई, ता. गेवराई जि.बीड सुसाणे २. सुभद्राबाई पिता धोंडीबा ससाणे वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. रूई, ता. गेवराई जि.बीड ३. प्रयागबाई भ्र शेषेराव जगदाळे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. रूई, ता. गेवराई जि.बीड ४. महानंदा भ्र दामोधर चव्हाण, वय ४९ वर्षे, धंदा–घरकाम रा.आमला (वाहेगाव), ता. गेवराई जि.बीड

**विरूध्द निरंक**

**मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क ०१ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क ०२ ते ०४ हे मयताच्या मुली आहेत. मयत नामे धोंडीबा गणा ससाणे यांचा मृत्यु दिनांक २७–०८–२००७ रोजी रा. रूई, ता. गेवराई जि. बीड येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे धोंडीबा गणा ससाणे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, नामे धोंडीबा गणा ससाणे, यांचे अर्जदार क ०१ ते ०४ हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख ०७/११/२०२६

स्वाक्षरित/– **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# भारतीय परिचारिका बंधू भगिनी यांना 'भारतरत्न' मिळावा यासाठी सरकारकडे पाठपुरावा करणार: अनिल जायभाये बीडकर

## बीड येथे 'महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया' मुंबई तर्फे 'आरोग्यरत्न' पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या डिजिटल मीडिया पत्रकारांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या 'महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबई' यांच्या वतीने बीड येथील हॉटेल अन्विता*श्र येथे भव्य 'आरोग्यरत्न पुरस्कार सोहळा' उत्साहात पार पडला. या प्रसंगी बोलताना आरोग्य सेवेत अहोरात्र योगदान देणाऱ्या नर्सिंग ऑफिसर्सना देश पातळीवर सर्वोच्च सन्मान म्हणजेच 'भारतरत्न' मिळावा, यासाठी पत्रकार संघटनेच्या वतीने सरकारकडे पाठपुरावा केला जाईल, असा निर्धार आरोग्य विभाग प्रमुख अनिल जायभाये बीडकर यांनी व्यक्त केला.

हा सोहळा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ संजय भोकरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख समीर देसाई सर यांच्या प्रेरणेने तर प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे सचिव सागर माने, महिला संघटक अश्विनी वायसे, व्यवस्थापक स्नेहल शेंडगे आणि वैद्यकीय विभाग प्रमुख अनिल जायभाये बीडकर यांनी विशेष पुढाकार घेतला. महाराष्ट्रातील डॉक्टर, नर्सिंग ऑफिसर्स, पॅरामेडिकल स्टाफ आणि इतर सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना एकत्र आणून संघटनेचा राज्यभरात विस्तार करण्याचा संकल्प यावेळी सोडण्यात आला.

समाजभूषण आणि आरोग्य दूतांचा गौरव..

या कार्यक्रमात समाजासाठी व देशासाठी अविस्मरणीय कार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रात एचआयव्ही (कखत) बाधितांसाठी निःस्वार्थ व समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या 'इन्फंट इंडिया, आनंदग्राम' संस्थेचे संस्थापक, ज्येष्ठ समाजसेवक तथा 'महाराष्ट्र भूषण' दत्ता बारगजे दादा (गुरुजी) यांचा यांच्या






संस्थेचा विशेष सन्मान करण्यात आला.

याशिवाय आदर्श नर्सिंग प्रा. श्रीपाल ससाणे, आदर्श नर्सिंग ऑफिसर्स शिवम गदळे सर, संगीता धुताडमल ताई, सुप्रिया जाधव ताई डक्त वसुधा ठोके ताई , दुर्गादास शिंदे ,पोलीस बॉईज संघटना सदस्य (राहुल दुबाळे सर) तसेच प्रा. हेरंब कुलकर्णी यांच्या 'साऊ एकल महिला समिती 'च्या सदस्यांचाही गौरव करण्यात आला.

डिजिटल मिडिया पत्रकारितेच्या माध्यमातून देशाला अधिक प्रगती पथावर घेऊन जाण्यासाठी, बेरोजगारीवर मात करत तरुणांना आत्मनिर्भरतेची दिशा देणारे आदर्श डिजिटल मिडिया क्रियेटर पत्रकार अक्षय रासकर, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष बालाजी जगतकर, जिल्हाध्यक्ष आरती परळकर ताई आणि बीड शहर बचाव मंच चे संयोजक नितीन जायभाये सर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास दैनिक तामिरचे संपादक तथा वरिष्ठ पत्रकार मकदुम काझी साहेब, मराठवाडा विभागीय अध्यक्षा आयेशा शेख मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

आरोग्य आणि पत्रकारिता यांचा समन्वय

कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच आता आरोग्य सेवा हीसुद्धा मानवाची अत्यावश्यक गरज बनली आहे. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा तो होऊच नये, यासाठी सर्वांनी खबरदारी आणि काळजी घेणे गरजेचे आहे.

डिजिटल मीडिया पत्रकार बांधव आणि आरोग्य सेवा क्षेत्रातील सर्व मूलभूत घटकांनी एकत्र येऊनसंघटन हीच खरी ताकद या भावनेने काम करावे. सर्वांच्या प्रश्नांवर सातत्याने संवाद व समन्वय साधून ते सोडवण्याचा निर्धार यावेळी उपस्थित सर्व आदर्श डॉक्टर नर्सिंग शिक्षक, नर्सिंग ऑफिसर्स , पॅरामेडिकल स्टाफ , व इतर सर्व आरोग्य सेवा कर्मचारी, आदर्श संस्थाचालक,मान्यवर, समाजसेवक व डिजिटल मिडिया पत्रकारांनी व्यक्त केला अशी माहिती अनिल जायभाये बीडकर यांनी दिली.

# जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमित्त जेष्ठांचा सन्मान शासकीय निवासी शाळा पाटोदाचा स्तुत्य उपक्रम

बीड ।प्रतिनिधी

जेष्ठ नागरिक दिन व सेवा संकल्प अभियान अंतर्गत कारेगाव तालुका पाटोदा येथील 'आजोळ ' या वृद्धाश्रमात सहायक आयुक्त कार्यालय बीड व मुलींची शासकीय निवासी शाळा पाटोदा जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदीप भोगले सर सहायक आयुक्त, समाज कल्याण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आजोळ वृद्धाश्रमातील आजी - आजोबा यांचा जेष्ठ नागरिक दिनामित्त सन्मान करून फळे वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले.यामध्ये नारळ, चिकू, करंज अशी सावली देणारे व फळ देणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.समाजिक बांधिलिकीची जोपासना व्हावी या करिता शासकीय निवासी शाळा पाटोदा येथील विद्यार्थिनीना 'आजोळ' या वृद्धाश्रमात आजी - आजोबा यांच्या भेटीसाठी नेण्यात आले.

निवासी शाळेतील मुलींना आजी आजोबा ना भेटण्याचा आनंद व आजीला नातींना भेटण्याचा आनंद दिसून येत होता. त्यामुळे वृद्धाश्रमात प्रसन्न वातावरण निर्माण झाले.ज्येष्ठांचा सन्मान करणे ही केवळ औपचारिकता नसून त्यांच्या योगदाना बद्दल समाजाने व्यक्त केलेली कृतगन्यता आहे.कुटूंब





आणी समाज या साठी जेष्टांचे योगदान अमूल्य असून त्यांना सन्मानपूर्वक व आपुलकीचे जीवन मिळण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे अस्मिता जावळे यांनी सांगितले.वृद्धाश्रमातील आजी आजोबा यांचा सन्मान मुख्याध्यापिका अस्मिता जावळे यांनी करून सर्वांशी संवाद साधला.आयुष्य आनंदी कसे जगायचे याबाबत अस्मिता जावळे यांनी उपस्थिताना सांगितले तसेच जेष्ठ व्यक्ती कुटूंबात असले तर त्या घरातील मुलांवर चांगले संस्कार होतात. जेष्ठांचा आदर त्यांची काळजी घेणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी विद्यार्थिनींना सांगितले.

आजोळ या वृद्धाश्रमाचे संचालक कर्न तांबे यांनी हा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला असून या बाबत माहिती सांगितली व सर्वांचा सन्मान केला.या वेळी सहायक आयुक्त कार्यालय बीड येथील श्रीम.कविता गायकवाड वरिष्ठ निरीक्षक श्रीम. मनीषा गायकवाड उपस्थित होत्या तर मुख्याध्यापिका अस्मिता जावळे, शिक्षिका स्वाती अस्वर, श्री. बाळू मुंढे, माध्यमिक शिक्षक, महेश उकांडे, प्रयोगशाळा सहाय्यक या उपक्रमात सहभागी होते.वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिकांना विविध फळे वाटप करण्यात आली व फळ झाडे व सावली देणारी झाडांचे वृक्षरोपण करण्यात आले.



# आविष्कार स्पर्धेत अश्वजीत रोकडेचे सुयश

बीड ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या अंतर्गत गेवराई येथील र.भ. अट्टल महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय 'अविष्कार २०२६' स्पर्धेत बीड येथील बलभिम महाविद्यालयाचा विद्यार्थी चि.अश्वजित देविदास रोकडे याने ह्युमॅनिटीज, लैंग्वेज अँड फाईन आर्ट या गटात प्रथम क्रमांक मिळवला. रोकडे अश्वजित याची केंद्रीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे.विद्यापीठ स्तरावर याच्या प्रकल्पांचे सादरीकरण होणार आहे. रोकडे अश्वजित'च्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, संशोधनाची आवड आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. रोकडे अश्वजित याच्या सुयशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अनिल चिंधे, अविष्कार समन्वयक डॉ. आर आर भोसले, डॉ. ए. के. आघाव, डॉ. पी. डी. जावळे पाटील, बी. टी. ताटे, डॉ. एस. बी. खामकर डॉ. वाय. एन. भराटे , डॉ संजय रत्नपारखे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक

# गोसावी समाजाच्या देवस्थान इनामी जमिनींचा प्रश्न मार्गी लागण्याची आशा

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना समाजबांधवांचे निवेदन वारस नोंदी कुळ-वहिवाट व फार्मर आयडी'बाबत मागण्या

अंबड ।प्रतिनिधी

गोसावी समाजाच्या देवस्थान इनामी जमिनी पारंपरिक पुजारी व वहिवाटदारांचे हक्क वारस नोंदी तसेच महसूल अभिलेखातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत या मागणीसाठी अंबड तालुका गोसावी समाजाच्या वतीने राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. महसूलमंत्र्यांनी समाजाच्या मागण्यांची माहिती घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे सकारात्मक आश्वासन दिल्याने हा प्रश्न लवकर मार्गी लागण्याची अपेक्षा समाजबांधवांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय गुरव समाज संघटनेचे अध्यक्ष ड. अण्णासाहेब शिंदे,परशुराम हिंदू सेवा संघाचे अध्यक्ष विश्वजीत देशपांडे,भटके विमुक्त दशनाम गोसावी समाज परिषद महाराष्ट्र राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी आणि मराठवाडा इनामी जमीन हक्क परिषदेचे अध्यक्ष ड.राजेंद्र बन यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बळीराम गिरी यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.

इनामी जमिनींसाठी एकसंध धोरणाची मागणी

देवस्थान इनामी जमिनींच्या प्रश्नावर राज्यस्तरावर स्पष्ट एकसंध व कायदेशीरदृष्ट्या सुसंगत धोरण निश्चित करावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.प्रत्येक प्रकरणात संबंधित इनामाचा प्रकार जुने सनद अभिलेख, सात-बारा उतारे,फेरफार नोंदी,इतर हक्कांतील नोंदी तसेच प्रत्यक्ष दीर्घकालीन वहिवाट यांची पडताळणी करून निर्णय घेण्यात यावा अशी भूमिका समाजाच्या प्रतिनिधींनी मांडली.

वारस नोंदी अद्ययावत करण्याची मागणी

पिढ्यान्पिढ्या देवस्थानची पूजा-अर्चा व धार्मिक सेवा बजावणाऱ्या पुजारी कुटुंबांच्या तसेच संबंधित वहिवाटदारांच्या वारस नोंदी महसूल अभिलेखात अद्ययावत कराव्यात अशी मागणी करण्यात आली. अनेक ठिकाणी प्रत्यक्ष वहिवाट आणि महसूल अभिलेखातील नोंदी यामध्ये तफावत असल्याचे समाजाच्या प्रतिनिधींनी सांगितले.जुने महसूल अभिलेख,सनद,फेरफार, वारस नोंदी,सात-बारा उतारे आणि प्रत्यक्ष वहिवाट यांची कायदेशीर पडताळणी करून पात्र वारस व संबंधित हक्कांची नोंद करण्याची मागणीही करण्यात आली.

कुळ-वहिवाटदारांच्या हक्कांचे संरक्षण देवस्थान इनामी जमिनींचा मूळ इनाम प्रकार संबंधित सनद, पूर्वीचे महसूल आदेश न्यायालयीन आदेश आणि विद्यमान अभिलेख यांचा एकत्रित विचार करूनच निर्णय घ्यावा.तसेच अनधिकृत हस्तांतरण बेकायदेशीर फेरफार अथवा अभिलेखातील विसंगती आढळल्यास नियमानुसार चौकशी करून कार्यवाही करावी अशी मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली.फार्मर आयडी सह शासकीय योजनांचा लाभ मिळण्याची मागणी

पात्र कुळ वहिवाटदार किंवा संबंधित लाभार्थ्यांच्या महसूल नोंदी स्पष्ट करून कृषीविषयक शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली फार्मर आयडी व अन्य अभिलेखीय प्रक्रिया सुलभ करावी अशी मागणी करण्यात आली. संबंधित योजनांच्या पात्रता निकषांनुसार लाभ देण्यात यावा असेही निवेदनात नमूद करण्यात आले.



सुधारित कायदेशीर प्रक्रियेकडे लक्ष

देवस्थान इनामी जमिनींच्या प्रश्नावर शासनाकडून सुरू असलेल्या सुधारित कायदेशीर प्रक्रियेकडे समाजाचे लक्ष लागले आहे. विविध हरकती सूचना न्यायालयीन प्रकरणे आणि संबंधित घटकांची मते विचारात घेऊन शासनाने निर्णय घ्यावा अशी अपेक्षा समाजाच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.महसूलमंत्री बावनकुळे यांनी निवेदनातील मागण्या जाणून घेत संबंधित प्रश्नांवर आवश्यक प्रक्रिया सुरू असून समाजाच्या मागण्यांचा विचार करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे समाजाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

या वेळी ज्ञानेश्वर बळीराम गिरी, शैलेश गिरी, कल्याण गिरी, हरिभाऊ गिरी, शेषराव गिरी, विष्णू गिरी, गोपाळ गिरी, शिवगिर गिरी, सुभाष घोडके,आकाश वैष्णव, संतोष गिरी,नारायण गिरी, नागेश गिरी,गजानन पांडुरंग पुरी,जनार्दन गिरी,राम गिरी, सुनील मरमट,अंकुश भारती, मिया भाई शेख,रवी पुरी, रामेश्वर पुरी,नवनाथ पुरी, संदीप पुरी,अरुण जोशी, राधाकिसन गिरी,गणपत हरिभाऊ गिरी,ज्ञानेश्वर त्रिंबक पुरी,बाळू पुरी आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

महसूलमंत्र्यांच्या सकारात्मक आश्वासनामुळे देवस्थान इनामी जमिनी पुजारी व वहिवाटदारांचे हक्क वारस नोंदी आणि महसूल अभिलेखातील प्रलंबित प्रश्नांवर शासनाकडून ठोस निर्णय होण्याची अपेक्षा समाजबांधवांनी व्यक्त केली.

# दावरवाडीत दुष्काळाची पाहणी; २७ शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे

दावरवाडी प्रतिनिधी/(ता. पैठण) : दावरवाडी शिवारात पावसाअभावी पिके जळून खाक झाल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची महसूल विभागाने शनिवारी पाहणी केली. दावरवाडीचे तलाठी राम म्हस्के यांनी शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे केले.गट क्रमांक ४९ शिवाजीराव शिंदे यांच्या शेताचा पंचनामा करताना यावेळी मस्के यांनी सांगितले की, आज दिवसभरात २७ शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे पंचनामे करण्यात आले आहेत. पावसाने दडी मारल्याने कापूस, बाजरीसह सर्वच पिके करपून गेली असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पंचनामे वेळी दावरवाडी गावचे महसूल विभागाचे तलाठी राम म्हस्के कर्मचारी दादासाहेब एडके शेतकरी शिवाजीराव शिंदे लक्ष्मण खोलाशे आप्पा सरोदे शेतकऱ्यांची



उपस्थिती होती पंचनाम्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येणार असून, शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

# हाय टेक सर्विसेस प्रा. लि.पुणे येथे प्रा.ईश्वर मुंडे यांचा सन्मान

केज/प्रतिनिधी

विकसनशील भारतात व्यवसायाच्या अनेक संधी आहेत. व्यावसायात सातत्य आणि विश्वासार्हता असेल तर यश मिळून भरभराटी होते असे मनोगत हाय टेक सर्विसेस प्रा.लि.कंपनी पुणे,चाकण चे संस्थापक तथा प्रसिद्ध उद्योगपती दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केले.बीड जिल्ह्यातील शैक्षणिक,सामाजिक, राजकीय व उद्योग क्षेत्रात अग्रेसर असलेल्या प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी हाय टेक सर्विसेस प्रा.लि.पुणे या अग्निशमन गाड्या बनवणाऱ्या कंपनीच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली असता दिनेश वाघमारे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी प्रा.ईश्वर मुंडे यांचे स्वागत करून कंपनी च्या कार्यशाळेत फिरून प्रत्यक्ष कामकाजाची माहिती दिली.यावेळी सोबत असलेल्या इंजि. विशाल शारदा सुंदरराव मुंडे यांचा ही सन्मान करण्यात आला.



# बीडच्या भूमिपुत्राची महाराष्ट्र रणजी संघात पुन्हा निवड, सौरभ नवलेच्या यशाची क्रिकेटविश्वात दखल

## यष्टीरक्षक फलंदाज म्हणून सातत्यपूर्ण कामगिरी, रणजीतील दमदार शतकासह महाराष्ट्राच्या विजयातही बजावली महत्त्वाची भूमिका

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या क्रिकेटविश्वासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी कामगिरी करणाऱ्या सौरभ शिवाजी नवले याची महाराष्ट्राच्या रणजी संघात निवड झाली आहे. यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या सौरभने २०२२ पासून महाराष्ट्राच्या वरिष्ठ क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०२२-२३ रणजी हंगामातील महाराष्ट्राच्या दिल्लीविरुद्धच्या सामन्यातही सौरभ नवले यष्टीरक्षक म्हणून संघात होता.

रणजी क्रिकेटमधील त्याच्या कामगिरीने बीडच्या क्रिकेटप्रेमींचे विशेष लक्ष वेधले आहे. जानेवारी २०२५ मध्ये नाशिक येथे बडोद्याविरुद्ध झालेल्या रणजी सामन्यात सौरभने ८३ आणि



नाबाद १२६ धावांची आक्रमक खेळी करत महाराष्ट्राच्या ४३९ धावांच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. या कामगिरीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कारही मिळाला.

सौरभच्या फलंदाजीबरोबरच त्याची यष्टीरक्षणाची जबाबदारीही महत्त्वाची राहिली आहे. महाराष्ट्राच्या रणजी संघातील अधिकृत सामन्यांच्या नोंदींमध्ये त्याची विकेटकीपर म्हणून नोंद आढळते. महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्येही सौरभने सातारा वॉरियर्सचे प्रतिनिधित्व केले आहे. चझडच्या अधिकृत आकडेवारीत त्याच्या नावावर ९ सामने, ७ डाव आणि १२७ धावा अशी नोंद आहे. यापूर्वी चझडच्या संघरचनेतही सौरभ नवलेचा महाराष्ट्राच्या वरिष्ठ क्रिकेटचा खेळाडू आणि यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून समावेश करण्यात आला होता. बीडच्या मातीतून क्रिकेटची सुरुवात करून राज्याच्या सर्वोच्च देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत स्थान मिळवणाऱ्या सौरभ नवलेचा प्रवास जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे. रणजी आणि दुलीप ट्रॉफीतील अनुभव, आक्रमक फलंदाजी आणि यष्टीरक्षणातील कौशल्याच्या जोरावर सौरभकडून आगामी सामन्यांमध्येही प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.बीड जिल्ह्याच्या या भूमिपुत्राच्या महाराष्ट्र रणजी संघातील निवडीबद्दल जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमी, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर आणि सौरभच्या चाहत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या निवडीबद्दल दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने अभिनंदन.

# स्वाधार योजना नुतनीकरण अर्ज ऑनलाईन सादर करण्यास १५ ऑक्टोंबर पर्यंत मुदतवाढ..!

बीड ।प्रतिनिधी

इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये व त्यांना जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे, यासाठी सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी पात्र आहेत, परंतु पुरेशा जागांअभावी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना त्यांचा घरभाडे खर्च व इतर खर्च भागविण्यासाठी सदर योजनेतून अर्थसहाय्य देण्यात येते. यामध्ये भोजनभत्ता, निवासभत्ता व निर्वाहभत्त्याचा समावेश आहे. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिकेच्या हद्दीपासून ०५ किलोमीटरच्या आत असलेल्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात लाभघेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या चालू शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज नुतनीकरण (ठशपशुरश्र) करण्यासाठी दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीपर्यंत अंतिम संधी देण्यात येत आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज सादर करताना मागील वर्षाचे गुणपत्रक व इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे तसेच चालू शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत (णविरींश) करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी अर्ज नुतनीकरण (ठशपशुरश्र) केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभमिळाला होता, अशाच विद्यार्थ्यांना विद्यमान पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षात प्रथम वर्षाकरीता (छशु) अर्ज सादर केला होता व त्याना स्वाधार योजनेचा लाभमिळालेला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनाही विहित मुदतीत नुतनीकरण अर्ज सादर करता येणार आहे.

शासकीय वसतिगृह प्रवेशाकरीता अर्ज केलेल्या परंतू जागेअभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनाच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येईल, याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास संबंधित विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीपर्यंत आपले नुतनीकरण अर्ज (ठशपशुरश्र) ऑनलाईन पद्धतीने भरून त्याबाबतची कागदपत्रे हार्डकॉपीसह विहित वेळेत सहायक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगररोड, बीड या कार्यालयात सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी केले आहे.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस उपस्थित रहा: राजू जोगदंड

## बीड शहरात पप्पू कागदे यांच्या वतीने विराट जाहीर सभा आयोजित

बीड/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने अडीच महिने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे.

असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, मझर खान, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा



पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

# श्री चिंतेश्वर विद्यालयाचा कुटुंब प्रबोधन मेळावा उत्साहात संपन्न

गेवराई ।प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री चिंतेश्वर विद्यालया मार्फत एकूण तीन कुटुंब मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.अनुक्रमे आगर नांदूर येथे महादेव मंदिर सभागृह,खांडवी तांडा येथे श्री मच्छिंद्रनाथ मंदिर सभागृह व गेवराई येथे चिंतेश्वर मंदिर सभागृह याठिकाणी हे कुटुंब मेळावे घेण्यात आले. या कुटुंब मेळाव्यामध्ये कुटुंब प्रबोधन,सामाजिक समरसता,स्व-बोध, पर्यावरण व सहा 'भ' अर्थात भजन,भोजन, भाषा, भ्रमण,भूषा,भवन याविषयी अनुक्रमे वक्ते श्री.अक्षयजी कुलकर्णी,श्री.दत्ताजी पत्की,श्री.सतीशजी चंदने यांनी पालकांना मार्गदर्शन केले.कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम, जिव्हाळा,परस्पर सहकार्य व संवाद असणे आवश्यक आहे असे सांगितले.तसेच समाजाप्रती



आपली जबाबदारी ओळखून सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण,स्वदेशीचा स्वीकार, नागरिक कर्तव्याचे पालन यासारख्या मूल्यांचे महत्त्व सांगण्यात आले.आगरनांदूर येथे ४३,खांडवी तांडा येथे २२ व गेवराई येथे ९७ कुटुंब उपस्थित होते. गेवराई येथील कुटुब मेळाव्यास ह.भ.प. दिलीप बाबा घोगे यांनी रामायणाचा दाखला देत *आदर्श कुटुंब व्यवस्था* ही काळाची गरज आहे असे सांगितले.विविध ठिकाणच्या कुटुंब मेळाव्यासाठी स्थानिक पदाधिकारी, संचालक,सभासद, श्री.प्रमोदजी कुलकर्णी,धनश्री ताई पत्की यांची उपस्थिती होती.सर्व ठिकाणचे कुटुंब मेळावे संपल्यानंतर उपस्थित सर्व कुटुंब, विद्यालयातील सहशिक्षक,वक्ते व पदाधिकारी यांनी एकत्रित भोजनाचा आस्वाद घेतला.

# हिसोडाच्या विद्या विकास विद्यालयाची दमदार कामगिरी

भोकरदन इसरारखान पठाण :- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही गुणवत्ता आणि क्रीडा कौशल्याची कमतरता नाही हे विद्या विकास विद्यालय हिसोडा येथील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखविले आहे. यु-१७ लेदर क्रिकेट स्पर्धेत विद्यालयाच्या संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करीत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. या शानदार कामगिरीच्या जोरावर संघाची जिल्हास्तरीय लेदर क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेदरम्यान हिसोडा विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ शिस्तबद्ध गोलंदाजी प्रभावी फलंदाजी आणि भक्कम क्षेत्ररक्षणाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत विजेतेपदावर आपले नाव कोरले. विजयानंतर खेळाडूंनी मैदानावर जल्लोष करत आनंद व्यक्त केला.निळ्या जर्सीतील खेळाडूंच्या चेहऱ्यावरील आनंद



यु-१७ लेदर क्रिकेट स्पर्धेत तालुक्यात प्रथम जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड

आणि विजयाची खूण दाखविणारे क्षण त्यांच्या मेहनतीची साक्ष देणारे ठरले.

या उल्लेखनीय यशामुळे विद्या विकास विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून हिसोडा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे पालक,शिक्षक आणि क्रीडाप्रेमींकडून कौतुक होत आहे.या अभिमानास्पद यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार चंद्रकांत पुंडलीकराव दानवे,संस्थेचे सचिव सुधाकर अण्णा दानवे,विद्यालयाचे मुख्याध्यापक,क्रीडा शिक्षक तसेच सर्व शिक्षकवृंदांनी विजयी संघाचे अभिनंदन केले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन सराव आणि आवश्यक संधी उपलब्ध करून दिल्यास ते तालुका व जिल्ह्याच्या पातळीवरच नव्हे तर राज्यस्तरावरही आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवू शकतात हे हिसोडाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.या यशामागे लेदर क्रिकेट संघाचे प्रशिक्षक डी.डी.गोरे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि अथक परिश्रम लाभले. नियमित सराव खेळातील बारकावे आणि सांघिक भावना यामुळे संघाने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.विजयानंतर प्रशिक्षक डी.डी.गोरे सर आणि खेळाडूंनी संस्थेचे अध्यक्ष, सचिव तसेच सर्व शिक्षकांचे आभार मानले.

आता जिल्हास्तरीय स्पर्धेतही दमदार कामगिरी करण्यासाठी हिसोडा विद्यालयाचा संघ सज्ज झाला असून या पुढील वाटचालीसाठी संस्थेच्या वतीने खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# नमुना क्रमांक ४३ वरील मालमत्तांची दस्त नोंदणी सुरू होणार

## नगरसेवक मुकेश चिने यांच्या मागणीची महसूलमंत्र्यांकडून दखल संबंधित अधिकाऱ्यांना सूचना

भोकरदन इसरारखान पठाण :- भोकरदन नगर परिषद हद्दीतील नमुना क्रमांक ४३ वर नोंद असलेल्या मालमत्तांच्या दस्त नोंदणीचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे नागरिकांना मालमत्ता खरेदी-विक्री तसेच कर्जप्रकरणांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही दस्त नोंदणी तातडीने सुरू करावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक मुकेश रामचंद्र चिने यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

या मागणीची दखल घेत महसूलमंत्री बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नमुना क्रमांक ४३ वरील मालमत्तांच्या दस्त नोंदणीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.भोकरदन शहरातील अनेक मालमत्तांची नोंद नमुना क्रमांक ४३ वर असल्याने त्यांच्या खरेदी-विक्रीच्या दस्तांची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात होत नसल्याचे नगरसेवक चिने यांनी निवेदनात नमूद केले आहे. दस्त नोंदणीअभावी अनेक मालमत्ता व्यवहार रखडले असून नागरिकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



विशेषतः बँक कर्जासाठी आवश्यक असलेले मालमत्ता व्यवहार नोंदणीअभावी अडकले आहेत. तसेच प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत घरकुलाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनाही अडचणी येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे सामान्य व गरजू नागरिकांचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची मागणी करण्यात आली आहे.

नगरसेवक मुकेश चिने, प्रवीण देशपांडे, संजय कोकाटे व इतर कार्यकर्त्यांनी हा विषय महसूलमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिला. भोकरदन हे तालुक्याचे ठिकाण असल्याने दररोज मोठ्या संख्येने नागरिक मालमत्ता व्यवहारासाठी येतात. मात्र दस्त नोंदणी होत नसल्याने त्यांना निराश होऊन परतावे लागत आहे. त्याचा परिणाम नागरिकांसोबतच शासनाच्या महसुलावरही होत असल्याचे त्यांनी सांगितले.

महसूलमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांमुळे नमुना क्रमांक ४३ वरील मालमत्तांच्या दस्त नोंदणीचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा निर्माण झाली असून नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# दुष्काळात हप्त्यांचा तगादा नको

## मायक्रो फायनान्स कर्जवसुलीला वर्षभर स्थगिती द्या कर्ज पुनर्रचनेचीही मागणी

जालना ।प्रतिनिधी

पावसाने पाठ फिरविल्याने जालना जिल्ह्यातील शेतकरी शेतमजूर महिला बचत गटांच्या सदस्या आणि छोटे व्यावसायिक आर्थिक संकटाच्या कचाट्यात सापडले आहेत.उत्पन्नाचे स्रोत आटले हाताला काम नाही मात्र कर्जाचे हप्ते थांबलेले नाहीत अशा दुष्काळी परिस्थितीत मायक्रो फायनान्स आणि एनबीएफसी संस्थांकडून होणाऱ्या कर्जवसुलीच्या तगाद्याविरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायत आक्रमक झाली आहे.

दुष्काळग्रस्त कर्जदारांना दिलासा देण्यासाठी मायक्रो फायनान्स व एनबीएफसी संस्थांच्या कर्जवसुलीला किमान एक वर्षाची स्थगिती द्यावी आणि कर्जाची पुनर्रचना करावी अशी मागणी ग्राहक पंचायत सोमवारी दि. ५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे करणार आहे.जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य तथा अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश तारगे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षांची भेट घेऊन निवेदन सादरणार आहे.

उत्पन्न बंद हप्त्यांचा मात्र सुरूच तगादा

जिल्ह्यात पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान झाले असून ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधीही घटल्या आहेत.अनेक कुटुंबांसमोर दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला आहे. शिक्षण आरोग्य घरखर्च तसेच छोटे व्यवसाय उभे करण्यासाठी घेतलेल्या कर्जाचे साप्ताहिक अथवा मासिक हप्ते भरणे अनेक कर्जदारांना अशक्य होत आहे.एकीकडे दुष्काळाची झळ दुसरीकडे कर्जवसुलीचा तगादा अशा दुहेरी संकटात कर्जदार अडकले आहेत.वारंवार फोन घरभेटी आणि वसुलीसाठी दबाव आणला जात असल्याने आर्थिक संकटासोबतच कर्जदारांवरील मानसिक ताणही वाढत असल्याचे ग्राहक पंचायतीचे म्हणणे आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याची मागणी जिल्ह्यातील सर्व मायक्रो फायनान्स आणि एनबीएफसी संस्थांची जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने संयुक्त बैठक घेऊन दुष्काळग्रस्त कर्जदारांना एक वर्षाची कर्जवसुली स्थगिती देण्याचा निर्णय घ्यावा. तसेच कर्जाची मुदत हप्त्यांची रचना आणि परतफेडीच्या अटी यांचा फेरविचार करून कर्ज पुनर्रचना करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

कर्जवसुलीच्या नावाखाली कर्जदारांशी गैरवर्तन किंवा अनावश्यक दबाव आणणाऱ्या संस्थांवर प्रशासनाने लक्ष ठेवावे. कर्जदारांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र जिल्हास्तरीय हेल्पलाइन अथवा तक्रार निवारण यंत्रणा सुरू करावी अशीही मागणी आहे.आरबीआयकडेही प्रस्ताव पाठवा दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बाधित कर्जदारांना विशेष आर्थिक दिलासा मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाने राज्य शासन तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे अधिकृत प्रस्ताव व शिफारस पाठवावी, अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे.जिल्ह्यात मायक्रो फायनान्स संस्थांकडील एकूण कर्जदारांची संख्या थकीत कर्जाची रक्कम तसेच दुष्काळामुळे बाधित झालेल्या कर्जदारांची स्वतंत्र आकडेवारी प्रशासनाने मागवून घ्यावी अशीही मागणी करण्यात आली आहे.

संकटग्रस्तांच्या जखमेवर वसुलीचा तगादा नको

दुष्काळाने होरपळलेल्या कुटुंबांकडून वसुलीचा तगादा लावण्याऐवजी त्यांना सावरण्यासाठी वेळ आणि आर्थिक श्वास देण्याची गरज आहे अशी भूमिका ग्राहक पंचायतीने घेतली आहे. प्रशासनाने संवेदनशील निर्णय घेऊन दुष्काळग्रस्तांच्या कर्जवसुलीला वर्षभर स्थगिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर आरबीआयचे प्रादेशिक कार्यालय जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट या मागणीसाठी सोमवारी होणाऱ्या भेटीत ड. डी. पी. पाटील,ड. मधुकर सोनवणे, ड. महेश धन्नावत,ड. वसीम, डॉ.देवराय चौरे आदींच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ सहभागी होणार आहे.या वेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# ‘अब्रूनुकसानीच्या दाव्याचे स्वागतच करेन’ ;प्राजक्ताताई धस यांचा बाळासाहेब आजबेंच्या आरोपांना प्रतिउत्तर

## जमिनी,देवस्थान आणि शाळेबाबतचे आरोप चुकीचे असल्याचा धस यांचा दावा

आष्टी (प्रतिनिधी)

बाळासाहेब आजबे यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना प्राजक्ताताई धस यांनी विविध मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली. खोटे बोल पण रेटून बोल, हेच बाळासाहेब आजबेंचे धोरण आहे. मी केलेल्या आरोपांपैकी एकाही आरोपाला त्यांनी समाधानकारक उत्तर दिलेले नाही, असा दावा त्यांनी केला. तसेच आजबे यांनी अब्रूनुकसानीचा दावा दाखल केल्यास त्याचे स्वागतच करेन, असेही त्यांनी सांगितले.आष्टी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना प्राजक्ताताई धस बोलत होत्या. यावेळी सुवर्णाताई गिन्हे, शीतल कर्डिले आणि आशा करांडे उपस्थित होत्या.जमिनीच्या व्यवहाराबाबत बोलताना धस म्हणाल्या की, आष्टी येथील सर्व्हे क्रमांक १७६ आणि १७७ या जमिनी पूर्वीपासून वर्ग-१ स्वरूपाच्या असून त्या खिदमतमास वर्गातील नसून मदतमास वर्गातील असल्याचा त्यांचा दावा आहे. त्यामुळे संबंधित जमिनींची रीतसर खरेदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राघापूर येथील जमिनीबाबतही संबंधित कुळांकडे आवश्यक असलेले ३२-ग प्रमाणपत्र नसल्याने कुळ हक्क सिद्ध होत नसल्याचे त्यांनी नमूद केले. ही जमीनही मालकांकडून रीतसर खरेदी करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

बाळासाहेब आजबे यांनी पत्रकार परिषदेत दाखविलेल्या कागदपत्रांबाबतही धस यांनी आक्षेप घेत ते चुकीच्या संदर्भातील असल्याचे म्हटले. मात्र, या जमिनींबाबतचे अंतिम हक्क व कायदेशीर स्थिती ही अधिकृत महसूल अभिलेख आणि सक्षम न्यायिक प्रक्रियेतूनच निश्चित होऊ शकते, असे या वादाच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट होते.

तवलवाडी आणि वाळुंज परिसरातील एका घटनेचा संदर्भ देताना धस म्हणाल्या की, वाळुंज येथील रघुनाथ पवार हे कार्यकर्ते असल्याने त्यांच्या फोननंतर आपण त्या ठिकाणी गेलो होतो. मात्र, या घटनेचा वेगळा अर्थ लावून मोठे षडयंत्र रचण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.



आजबे यांच्या राजकीय कारकिर्दीवरही धस यांनी टीका केली. तुम्ही बाजारातून आला नाहीत असे म्हणता; मात्र अदृश्य हातांमुळेच तुम्ही आमदार झाला होता, असे त्या म्हणाल्या. मागील पाच वर्षांत मतदारसंघाच्या विकासाबाबत अपेक्षित काम झाले नसल्याचा आरोप करत, त्याबाबत आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांना आजबे उत्तर देऊ शकत नसल्याचा दावाही त्यांनी केला.

दुष्काळी मोर्चाच्या संदर्भातही त्यांनी आजबे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. कोणत्याही महिलेचे नाव घेऊन तिच्याबाबत अवमानकारक वक्तव्य केलेले आपण सहन करणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. दादेगाव येथील रामचंद्र देवस्थानच्या जमिनीबाबतही धस यांनी आपली भूमिका मांडली. हे देवस्थान ऐतिहासिक आणि पौराणिक संदर्भ असलेले असल्याचे सांगत, या देवस्थानासाठी पूर्वी जमीन देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. देवस्थानच्या जमिनीबाबत शेतकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण होत असून त्यामुळे देवस्थानला अपेक्षित देणगी मिळत नसल्याने मंदिरांच्या विकासावर परिणाम होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, या आरोपांबाबत संबंधित महसूल व देवस्थान अभिलेखांनुसार वस्तुस्थिती तपासणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आम्हाला या देवस्थानाचे ट्रस्टी होण्यात कोणताही स्वारस्य नाही. पुरातन मंदिराचा विकास व्हावा, हा आमचा उद्देश असून त्यासाठी आम्ही ट्रस्टला मदत करत आहोत, असे धस यांनी सांगितले. पिंपळेश्वर देवस्थान संस्थानच्या मालकीच्या अनिशा ग्लोबल शाळेबाबतही त्यांनी स्पष्टीकरण दिले. अनिशा ग्लोबल शाळा ही पिंपळेश्वर देवस्थान संस्थानच्या मालकीची असून ती आमच्या कुटुंबाच्या मालकीची नाही. त्यामुळे आरोप करण्यापूर्वी संबंधितांनी योग्य माहिती घ्यावी, असे धस म्हणाल्या.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावरून आजबे आणि धस यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू असून जमिनी, देवस्थान आणि शाळेच्या मालकीसंबंधीचे दावे संबंधित कागदपत्रे, महसूल अभिलेख आणि आवश्यक असल्यास न्यायालयीन प्रक्रियेतून स्पष्ट होण्याची शक्यता आहे. बाळासाहेब आजबे यांनी अब्रूनुकसानीचा दावा दाखल केल्यास त्याचे आपण स्वागतच करू, असे सांगत प्राजक्ताताई धस यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.



## सुप्रसिद्ध तबलावादक श्री.बाळासाहेब आलासकर यांना

### संगीताचार्य वै. विष्णुदेव केजकर अध्यात्म सेवाव्रती पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान

केज/प्रतिनिधी

श्री कलोपासक प्रतिष्ठान केजच्या वतीने दिला जाणारा ’संगीताचार्य वैकुंठवासी विष्णुदेव केजकर अध्यात्म सेवावृत्ती पुरस्कार’ नृसिंहवाडी येथील प्रसिद्ध तबलावादक श्री.बाळासाहेब आलासकर यांना ह.भ.प.श्री पुष्कर महाराज गोसावी (नाथ वंशज पैठण) व प्रसिद्ध कथाकार ह.भ.प.श्री. समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संगीत,अध्यात्म आणि कलाक्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार कलोपासक प्रतिष्ठान केजच्या वतीने दिला जातो.श्री.बाळासाहेब आलासकर हे गेल्या पन्नास वर्षापासून संगीत,नाट्य,साहित्य, कला,कीर्तन या क्षेत्रातील विविध उपक्रम आयोजित करत आहेत.आज पर्यंत अनेक नामवंत कीर्तनकार व कलाकारांची तबला साथ त्यांनी केलेली आहे त्यांच्या प्रदीर्घ कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी शनीवारी समर्पण कीर्तन महोत्सवामध्ये प्रदान करण्यात आला. सर्व स्तरातून श्री. बाळासाहेब आलासकर यांचे अभिनंदन होत आहे. हा केवळ माझा सत्कार नाहीतर माझ्या परंपरेचा सत्कार आहे असे मनोगत श्री. बाळासाहेब आलासकर यांनी व्यक्त केले.श्री.बाळासाहेब अलासकर यांचे कार्य समाजाला प्रेरणा देणारे आहे असे गौरवोद्गार ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी काढले.या सत्कार समारंभ प्रसंगी ह.भ.प.श्री.लक्ष्मीकांत देव,पंडित गंगाधर देव, युवानेते रणजित भैय्या आडसकर यांच्या सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत हरणाचा मृत्यू; पाण्याच्या शोधात वन्यप्राणी मानवी वस्तीकडे!

## डोरली येथील राज्य महामार्ग क्र. २५१ वरील घटना; तामसा परिसरात टोलनाक्याजवळ बिबट्या दिसल्याने नागरिकांमध्ये सतर्कतेची गरज

तामसा (प्रतिनिधी) : पावसाअभावी निर्माण झालेली पाणीटंचाई आणि पाण्याच्या शोधात वन्यप्राण्यांचा मानवी वस्तीकडे वाढणारा वावर यामुळे वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तामसा परिसरातील डोरली येथे राज्य महामार्ग क्रमांक २५१ वर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका हरणाचा मृत्यू झाल्याची घटना ३ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, डोरली परिसरातून जाणाऱ्या राज्य महामार्गावर पाण्याच्या शोधात आलेल्या हरणाला अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात हरणाचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनरक्षक बालाजी बनसोडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर मृत हरणाच्या मादीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी वनमजूर बाबुराव चव्हाण, वाहनचालक सुधीर भागवत, गावकरी तसेच पोलीस पाटील यांनी घटनेची माहिती वनविभागाला दिली. वन्यप्राणी पाण्याच्या शोधात रस्ते ओलांडत असताना वाहनांच्या धडकेत त्यांचा जीव जाण्याच्या घटना चिंतेचा विषय बनत आहेत.

तामसा परिसरात टोलनाक्याजवळ बिबट्या दिसल्याची चर्चा

दरम्यान, तामसा परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ (आय) वरील टोलनाक्याजवळ बिबट्या दिसल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. या वृत्तामुळे



परिसरातील नागरिकांमध्ये वन्यप्राण्यांच्या वावराबाबत सतर्कता बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे.

वन्यप्राण्यांना पाण्यासाठी मानवी वस्तीकडे यावे लागू नये, यासाठी वनविभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच महामार्ग आणि राज्य मार्गांवरील वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या ठिकाणी वाहनचालकांना सावध करणारे फलक लावावेत, अशी मागणी नागरिकांकडून होतं आहे.वन्यप्राणी दिसल्यास नागरिकांनी त्यांच्याजवळ जाणे, त्यांना घेरणे किंवा त्यांचे फोटो काढण्यासाठी गर्दी करणे टाळावे. बिबट्या दिसल्याची माहिती वनविभागाला तातडीने द्यावी, असे आवाहनही वनविभाग यांच्या कडून वनरक्षक बालाजी बनसोडे यांनी नागरिकांना केला..




## हिमायतनगरच्या दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी आमदार बाबुराव कदम कोहळीकरांचा आरोग्य शिबिरातून आधार

### पाच ते सात हजारांहून अधिक रुग्णांचा सहभाग; दुष्काळाच्या काळात आरोग्यसेवेचा दिलासा - शंभरहून अधिक जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा घेणार

हिमायतनगर (प्रतिनिधी)

तालुक्यात यंदा निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे बळीराजा आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. अशा कठीण प्रसंगी दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना धीर देण्यासाठी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या वतीने हिमायतनगर शहरात भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, परिसरातील पाच ते सात हजारांहून अधिक रुग्णांनी या आरोग्यसेवेचा प्रत्यक्ष लाभ घेतला.

यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडून रुग्णांची मोफत तपासणी करून आवश्यक औषधोपचार पुरवण्यात आले. केवळ आरोग्याची काळजी घेऊन न थांबता, दुष्काळाच्या काळात शेतकरी कुटुंबांवरील लग्नसराईचा मोठा आर्थिक भार हलका करण्यासाठी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला असून, येत्या काळात तालुक्यातील शंभरहून अधिक गरीब व शेतकरी जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा स्वखर्चाने आयोजित केला जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या या सामाजिक आणि दिलासादायक उपक्रमांचे हिमायतनगर तालुकाभरातून विशेष कौतुक केले जात आहे.

# चारा टंचाईवर मात करण्यासाठी चारा साक्षरता अभियान-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## सायाळ येथे नेपियर लागवड; निकृष्ट चारा सकस करण्याचे व मुरघास निर्मितीचे प्रात्यक्षिक

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : संभाव्य दुष्काळी परिस्थितीत निर्माण होणाऱ्या चारा टंचाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी पशुसंवर्धन, कृषी, जलसंधारण, महसूल, पंचायत समिती तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून जिल्ह्यात ‘चारा साक्षरता अभियान’ व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

पशुधनासाठी वर्षभर सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत जिल्हा जलसंधारण अधिकारी, नांदेड यांच्या सहकार्याने मौजे सायाळ, ता. लोहा येथे नाला बांधावरील तसेच गाळपेरा क्षेत्रात बहुवार्षिक नेपियर चारा पिकाची लागवड करण्यात आली. यावेळी पशुपालकांसाठी निकृष्ट चारा सकस करण्याची प्रक्रिया तसेच मुरघास निर्मितीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले.

या उपक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरुटे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, तहसीलदार विठ्ठल परळीकर, डॉ. अंकुश पाटील, डॉ. रंगनाथ पुरी, डॉ. दीप्ती चव्हाण, डॉ. उमेश धोंड, डॉ.



बालाजी जाधव, भागवत परगे, बजरंग ढगे यांच्यासह पशुसंवर्धन, जलसंधारण, महसूल, कृषी व पंचायत समिती विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

निकृष्ट चारा सकस करण्यावर भर

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वैरण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. उपलब्ध वाळलेल्या व निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे, कडबा कुट्टीचा वापर वाढविणे तसेच हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करून त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

जिल्ह्यातील उपलब्ध जलस्रोत, नाला बांध तसेच गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी प्रभावी वापर करावा. बहुवार्षिक चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देऊन भविष्यातील चारा टंचाईच्या परिस्थितीसाठी आतापासूनच नियोजन करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले.

शेतकरी, पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण

‘चारा साक्षरता अभियान’च्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांना चारा उत्पादन, चारा संवर्धन, मुरघास निर्मिती, कडबा कुट्टीचा वापर आणि निकृष्ट चाऱ्याचे सकस व पौष्टिक चाऱ्यात रूपांतर याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात येणार आहे.उपलब्ध साधनसामग्री व जलस्रोतांचा योग्य वापर करून पशुधनासाठी वर्षभर चारा उपलब्ध राहील, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे, यावर अभियानात भर देण्यात येत आहे.

# स्वच्छतेसाठी फोटो शेसन अधिकारी-कर्मचारी एकवटले;.? चार तास श्रमदान!..

## तामसा ग्रामपंचायतीच्या स्वच्छता अभियानात अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग; गटविकास अधिकाऱ्यांच्या हस्ते महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन

तामसा, (प्रतिनिधी )

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त तामसा ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या ग्रामस्वच्छता अभियानात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत श्रमदान केले. शहरातील आठवडी बाजार, अंगणवाडी परिसर तसेच राष्ट्रीय महामार्गालगतच्या दुभाजकातील कचरा हटविण्यासाठी सुमारे चार तास स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

ग्रामपंचायत कार्यालयात गटविकास अधिकारी दशरथ आडेराव यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची सामूहिक शपथ घेतली.तामसा शहरातील आठवडी बाजार परिसरात तसेच रस्त्याच्या दुभाजकात मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा गोळा करण्यात आला. जमा केलेला कचरा ग्रामपंचायतीच्या घंटागाडीतून शहराबाहेर नेण्यात आला. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या अभियानात विस्तार अधिकारी मुंडकर, बाळासाहेब पवार, ग्रामपंचायतीचे प्रशासक गिरीधर



मोळके, ग्रामविकास अधिकारी शंकर आलेवाड, कर्मचारी संभाजी हेंबाडे, अमित मोपलवार, किसन कोठूले, तेजस लाहेवार,यांच्यासह आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि सफाई कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती नियमितपणे राबविणे गरजेचे आहे. शहरातील कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि नागरिकांमध्ये जनजागृती यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न होणे आवश्यक असल्याची भावना यावेळी प्रशासक अधिकारी गिरीधर मोळके यांनी व्यक्त करीत कर्मचाऱ्यांना धारेवर धरलं ..

स्वच्छता अभियान केवळ फोटोसेशनपुरतेच राहू नये!

महात्मा गांधी जयंतीनिमित्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी चार तास श्रमदान करून स्वच्छतेचा संदेश दिला. मात्र, शहरात नियमित स्वच्छता राखणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता होऊ न देणे, ही प्रशासनाची रोजची जबाबदारी आहे. त्यामुळे स्वच्छता अभियान केवळ एका दिवसाचा उपक्रम न ठरता वर्षभर सातत्याने राबविण्याची गरज आहे. एक दिवसाची स्वच्छता नव्हे, तर कायमस्वरूपी स्वच्छ तामसा हेच अभियानाचे उद्दिष्ट असावे..

# स्व. केशरकाकू क्षीरसागर यांना मरणोत्तर सन्मान

## स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समिती व स्वातंत्र्यसैनिकांच्या वतीने सन्मानपत्र, जयदत्त क्षीरसागर यांनी स्वीकारले

बीड प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या माजी खासदार तथा अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या २० व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांना मरणोत्तर सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समिती व स्वातंत्र्यसैनिकांच्या वतीने हा सन्मान करण्यात आला. स्व. काकूंच्या वतीने त्यांचे पुत्र तथा अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सन्मानपत्र स्वीकारले.

'काकू नाना प्रतिष्ठान, बीड' यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास केंद्र सरकारचे आवास व शहरी विकास राज्यमंत्री टोकन साहू, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार बसवराज पाटील, आमदार विक्रम काळे, माजी आमदार भीमराव धोंडे, छत्तीसगड महिला आयोगाच्या अध्यक्षा ममता साहू, अखिल भारतीय तैलिक साहू



महासभेचे राष्ट्रीय महासचिव रामलाल गुप्ता, दयाभाई मोदी यांच्यासह साधू-संत, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्व. केशरकाकूंनी बीडला रेल्वे मिळावी तसेच जिल्ह्याचा विकास व्हावा यासाठी सुमारे २५ वर्षे सातत्याने संघर्ष केला. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे यावेळी स्मरण करण्यात आले. त्यांच्या रेल्वे आंदोलनातील योगदानाबद्दल स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने मरणोत्तर सन्मान देण्यात आला.

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, सहसचिव रवि उबाळे, विष्णुदास बियाणी, शिवाजी जाधव, मंगेश लोळगे, अरुण डाके, विलास बडगे व समितीचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन झाले.

# चि.प्रणव आरुने पाटोदा शाळेला दिली साऊंड सिस्टीमची अनोखी भेट

वाढदिवसाच्या खर्चाला फाटा

आष्टी (एस.राजेंद्र लाड) येथील वसुंधरा शाळेत इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या चि. प्रणव प्रसाद आरु याने आपल्या वाढदिवसानिमित्त हॉटेलमध्ये खर्च न करता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथील विद्यार्थ्यांसाठी साऊंड सिस्टीम भेट देत सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श निर्माण केला. शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत हा उपक्रम उत्साहात पार पडला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा ही शाळा सर्वांगसुंदर, सुसज्ज आणि हिरवीगार करण्यासाठी मुख्याध्यापक श्री. उत्तम पवार सर सातत्याने प्रयत्नशील आहेत. शाळेच्या विकासासाठी लोकसहभाग वाढावा, माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून शाळेला जास्तीत जास्त मदत मिळावी तसेच विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी गावामध्ये प्रभावीपणे जनजागृती व प्रचार-प्रसार



केला आहे.

पवार सरांचे जावई प्रसाद आरु यांचा मुलगा चि. प्रणव प्रसाद आरु याचा वाढदिवस यंदा वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च न करता शाळेला उपयोगी अशी वस्तू भेट देण्याची संकल्पना पुढे आली. पाटोदा शाळेला साऊंड सिस्टीमची आवश्यकता असल्याचे लक्षात आल्यानंतर पवार सरांनी कुटुंबीयांशी चर्चा केली. त्यांच्या या आवाहनाला प्रसाद आरु यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कोणताही विलंब न करता शाळेसाठी सुंदर व टिकाऊ साऊंड सिस्टीम उपलब्ध करून दिली.

साऊंड सिस्टीम शाळेला सुपूर्द करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. पवार व आरु कुटुंबीयांनीही विद्यार्थ्यांचा आनंद पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी आरु कुटुंबीयांनी शाळेच्या विकासासाठी भविष्यातही आवश्यक ती मदत करण्याची तयारी दर्शविली.

या उपक्रमाबद्दल पवार व आरु कुटुंबीयांचे परिसरातून कौतुक होत असून, वाढदिवसाचा अनाठायी खर्च टाळून शाळेला उपयोगी साहित्य भेट देण्याचा प्रणवचा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

यावेळी शाळेच्या वतीने चि. प्रणव आरु याचा मानाचा फेटा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी प्रणवला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्याच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब गव्हाणे होते. समिती सदस्य संतोष मोरे, भाऊ शिंदे, ग्रामस्थ तसेच शाळेतील उपक्रमशील शिक्षक जितेंद्र आढाव सर, अनिल आष्टेकर सर, तंत्रस्नेही संतोष डोके सर, श्रीमती रासने मॅडम, आशाबाई गव्हाणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जितेंद्र आढाव सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. संतोष डोके सर यांनी केले. वाढदिवसानिमित्त शाळेला दिलेली ही साऊंड सिस्टीम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

# महिलांच्या सक्षमी करणासाठी येडेश्वरी फाउंडेशनचा पुढाकार

### कौशल्य विकास प्रशिक्षणार्थी महिलांना प्रमाणपत्र व ब्युटी पार्लर साहित्याचे वाटप

केज/प्रतिनिधी

दि.३ ऑक्टोबर २०२६ शनिवार रोजी पंचायत समिती कार्यालय,केज येथे येडेश्वरी फाउंडेशन तथा स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिला भगिनींना प्रमाणपत्र तसेच ब्युटी पार्लर प्रशिक्षणार्थींना ब्युटिशियन साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली येडेश्वरी फाउंडेशन हे अनेक वर्षांपासून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवत आहे.महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने फाउंडेशनच्या माध्यमा तून विविध कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.या प्रशिक्षणात सहभागी होऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिला भगिनींना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच ब्युटी पार्लर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना स्वतःचा व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे, या उद्देशाने ब्युटिशियन साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान,नुकताच सौ. कविताताई गित्ते कराड यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महिलांच्या कौशल्य विकासाचे आणि स्वावलंबनाचे महत्त्व अधोरेखित करत येडेश्वरी फाउंडेशनच्या उपक्रमाचे तोंडभरून

कौतुक केले.या कार्यक्रमाचे आयोजन येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख सौ.शितलताई लांडगे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान सौ.विमलताई जोगदंड यांनी भूषविले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय आदर्श शिक्षिका सौ.कविता ताई गित्ते कराड, क्रांतीज्योती पत संस्थेच्या व्यवस्थापक सौ.रत्नमाला कापरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शप)च्या शहराध्यक्ष सौ.सुनिताताई डबरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या समूह संघटक सौ.शारदाताई गुंड, ड.अनिताताई मुंडे, न्यू इंटेल कॉम्प्युटर सेंटरच्या संचालिका विजयाताई सत्वधर, सीआरपी प्रियाताई चाळक,प्रयागाताई ढाकणे,ट्रेनर प्रीती इंगळे,मनीषा टोपे, वैशालीताई काकडे, रत्नमाला गायकवाड, माया कसबे,शेख शनया,सरस्वतीताई शिनगारे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.महिलांच्या हाताला कौशल्य,कौशल्याला रोजगार आणि रोजगारातून आर्थिक स्वावलंबन मिळवून देण्याच्या दिशेने येडेश्वरी फाउंडेशनचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

## प्रकाश रामजी डाढाळे यांचे निधन

अर्धापूर (प्रतिनिधी)

शहरातील श्रीरामनगर येथील रहिवाशी प्रकाश रामजी डाढाळे (वय ६५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दि.४ रविवारी रोजी स.११ वा निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी रोजी सायंकाळी अर्धापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.प्रकाश रामजी डाढाळे यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा ,दोन मुली,नातवंड असा परिवार आहे. ते नवनाथ डाढाळे यांचे वडील, दिलीपराव डाढाळे व नितीन डाढाळे यांचे काका होत.



## कस्तुरबाई बेजगमवार यांचे निधन



नविन नांदेड :- जिंदमनगर गोपाळचावडी येथिल रहिवाशी कस्तुरबाई दिनानाथ बेजगमवार यांचे दि ४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ८.२० वाजता अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले निधन समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांचा अंत्यसंस्कार दि ४ ऑक्टोंबर रोजी ४. ३० वा गोपाळचावडी येथिल स्मशान भुमित करण्यात आले असून त्यांच्या पश्चात प्रभाकर बेजगमवार बालाजी बेजगमवार चंदाताई बासटवार विठ्ठल बेजगमवार तिन मुले एक मुलगी यांच्या सह सुना नातु पंतु असा मोठा परिवार आहे .




बीड (प्रतिनिधी)

जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकामुळे रुग्णवाहिकांना एक ते दोन किलोमीटरचा वळसा घ्यावा लागत आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होत असून, दुभाजकात तातडीने आपत्कालीन रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र मार्गिका खुली करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे यांनी केली.या मागणीसाठी डॉ. ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दुभाजकाजवळ निदर्शने करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदन देण्यात आले.

# चांगले जीवन जगण्यासाठी रामकथा ऐकणे गरजेचे -संजय महाराज पाचपोर

गेवराई (प्रतिनिधी):-राम, सूर्य, चंद्र, तारे, आकाश, नदी आणि पाणी जसे नित्य नूतन आहेत, त्याचप्रमाणे प्रभू श्रीरामांची रामकथाही आज नित्य नूतन आहे. रामकथा ही केवळ कथा नसून आपल्या प्रपंचाला योग्य दिशा देणारी जीवनपद्धती आहे. ज्यांनी आपल्या आयुष्याची साठ सत्तर वर्षे जनसेवेसाठी दिली, राज्यकर्त्यांच्या समोर एक आदर्श उभा केला अशा शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेली ही रामकथा पुन्हा पुन्हा ऐकून आपले जीवन सफल होईल असे प्रतिपादन संजय महाराज पाचपोर यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव ( दादा) पंडित वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व भव्य कीर्तन महोत्सवात ते रामकथा साग़ताना बोलत होते. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि भाविक भक्त उपस्थित होते.माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९व्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ आणि कीर्तन महोत्सवाचा शनिवारी दि.३ रोजी सकाळी भव्य शोभायात्रेने उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर शिवनगरी येथे रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांच्या रामकथेस प्रारंभ झाला. यावेळी कथेच्या प्रारंभी ह.भ.प.कृष्णा महाराज राऊत, गणेश महाराज वारंगे, ह.भ.प तिर्थराज पठाडे, ह.भ.प. हानुमान महाराज, ह.भ.प. नामदेव महाराज , अभिष्टचिंतन सोहळा समितीचे भाऊसाहेब नाटकर यांच्या हस्ते कलश पुजन, प्रतिमा पुजन, ग्रंथपुजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आपल्या अमोघ वाणीतून पाचपोर महाराज यांनी रामकथा प्रस्तूत करुन उपस्थित भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले.

रामकथा सांगत असताना





### शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीराम कथा व भव्य कीर्तन महोत्सवाचा शोभायात्रेने झाला शुभारंभ

संजय महाराज पाचपोर म्हणाले की, जसा जीवन जगण्यासाठी प्राणवायू आवश्यक आहे, त्याचप्रमाणे चांगले आणि संस्कारक्षम जीवन जगण्यासाठी रामकथा आवश्यक आहे. विश्वाला जीवन देण्याचे काम अन्न करते. जीवन जगण्यासाठी अन्न जितके गरजेचे आहे, तितकीच जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी रामकथा गरजेची आहे. ज्याला केवळ जीवन जगायचे आहे त्याला अन्नाची गरज असते; मात्र ज्याला चांगले, आदर्श आणि संस्कारपूर्ण जीवन जगायचे आहे, त्याने रामकथा ऐकली पाहिजे. रामकथा माणसाला कर्तव्य, संस्कार, संयम आणि सदाचाराची दिशा देणारी असल्याने तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. रामकथा ही व्यासपीठावरील कथा नाही तर ती प्रत्येक घरातील कथा आहे असेही संजय महाराज पाचपोर यांनी सांगितले. यावेळी त्यांना संगीत साथ गायक अच्युत पाटील, विवेक गावंडे, बासरीवादक राम पाटील आणि

तबलावादक अक्षय मोरे यांनी दिली. कथेची सांगता प्रभू रामचंद्राच्या आरतीने करण्यात आली. यावेळी रिल्सस्टार आणि असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आरती संपन्न झाली.

शिवाजीराव पंडित यांनी राज्यकर्त्यांसमोर जनसेवेचा आदर्श निर्माण केला आहे---संजय महाराज पाचपोर

माजीमंत्री शिवाजीराव पंडित यांनी आपल्या आयुष्यातील साठ-सत्तर वर्षे जनसेवेसाठी समर्पित केली. समाजातील शेवटच्या घटकातील माणसाचा विचार करून त्यांनी जनकल्याणाच्या विविध योजना राबविल्या. त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक व सार्वजनिक कार्यातून आजच्या राज्यकर्त्यांसमोर जनसेवेचा आदर्श निर्माण झाला आहे. शिवाजीराव पंडित यांनी जपलेला हा जनसेवेचा विचार सक्षमपणे पुढे घेऊन जाताना अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित आणि जयसिंग पंडित हेदेखील सामाजिक कार्यात अग्रेसर राहून जनसेवेचा वारसा पुढे नेत आहेत, असे गौरवोद्गार पाचपोर महाराज यांनी काढले.

ज्ञानोबा-तुकारामाच्या जयघोषाने गेवराई नगरी दुमदुमली

कीर्तन महोत्सवाच्या शुभारंभ भव्य शोभायात्रेने करण्यात आला.चिंतेश्वर मंदिर येथून सकाळी साडेदहा वाजता शोभायात्रेला प्रारंभ झाला. यामध्ये जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिवाजीनगर गढी, शारदा विद्या मंदिर, गेवराई तसेच शिवशारदा पब्लिकेशन स्कूल, शिवाजीनगर गढी या शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, विठ्ठल-रुक्माई यांच्यासह विविध संतांच्या व देवदेवतांच्या वेशभूषा साकारल्या होत्या. आकर्षक वेशभूषेतील विद्यार्थी शोभायात्रेचे विशेष आकर्षण ठरले.

शोभायात्रेत वारकऱ्यांची दिंडी, टाळ-मृदंगाचा गजर आणि विठ्ठलनामाचा जयघोष यामुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम', 'पांडुरंग हरी' अशा जयघोषांनी संपूर्ण गेवराई शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांची रथामधून गेवराई शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या शोभायात्रेत शिवाजीराव पंडित अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजसेवक तसेच भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शोभायात्रेचा समारोप र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावरील शिवनगरी येथे करण्यात आला.



# घरफोडीतील तिसरा आरोपी जेरबंद; ४५ तोळे सोने जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड/अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहरातील घरफोडी प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने परळी रेल्वे पुलाजवळ सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून १८ तोळे (१८७.४३० ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि ७४३ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे घरफोडीच्या गुन्ह्यातील चोरीच्या मुद्देमालापैकी आतापर्यंत ४५ तोळे सोन्याचे आणि १६०१ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.

अंबाजोगाई येथील एक कुटुंब राहत्या घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. २० सप्टेंबर २०२६ रोजी अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश केला आणि सोन्याचे ५३ तोळे दागिने, सुमारे दोन किलो चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची तक्रार नोंदविण्यात आली होती. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांनी यापूर्वी दोन संशयितांना अटक करून त्यांच्याकडून २७ तोळे (२७० ग्रॅम) सोने आणि ८५८ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त केले होते. या प्रकरणातील आणखी एक आरोपी फरार होता. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे त्याचा शोध सुरू ठेवण्यात आला होता, ३ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त सापळा रचून फरार आरोपीला परळी रेल्वे पुलाजवळ ताब्यात घेतले. पोलिसांच्या माहितीनुसार त्याच्याकडून १८ तोळे सोन्याचे दागिने आणि ७४३ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात आले.

# अश्वगंधा महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील आडस प्रभागातील अश्वगंधा महिला प्रभाग संघ,आडस यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच उत्साहात संपन्न झाली.या सभेसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे सर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका अभियान व्यवस्थापक नंदा ओव्हाळ मॅडम, तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून आडस च्या सरपंच राधिकाताई आडसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेच्या सुरुवातीस प्रभाग संघाच्या मागील वर्षातील आर्थिक व्यवहार,उत्पन्न-खर्च व आर्थिक उलाढालीचा लेखाजोखा याचे वाचन तालुका अभियान व्यवस्थापक नंदा ओव्हाळ मॅडम यांनी केले.तसेच प्रभाग संघाच्या विविध कामांचा व प्रगतीचा आढावा घेण्यात आलाउपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना पुढील कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे आवाहन केले.



गावातील १०० % कुटुंबांचे सर्वेक्षण करून पुढील दोन दिवसांत गट बांधणी पूर्ण करणे,सर्व कॅडरचे प्रोफाइल पूर्ण करणे,बँक कर्जाचे प्रस्ताव तयार करून सादर करणे,गट व ग्राम संघाचे कट आफ पूर्ण करणे व मीटिंग ऑनलाइन करणे सर्व गटांचे एमआयपी पूर्ण करणे,ग्राम संघाचे ऑडिट पूर्ण करणे,गटांचे आर एफ फॉर्म भरणे,नवीन गटांची बँक खाती उघडणे,सर्व सदस्यांचे इ के वाय सी पूर्ण करणे,बँक कर्ज,आर एस इ टी आय प्रशिक्षण व महिलांसाठी उपलब्ध विविध संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच मा.बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व व्यवसाय उभारून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याबाबत मार्गदर्शन केले.यावेळी प्रभागसंघाच्या विविध रेकॉर्ड व नोंदींची तपासणी करण्यात आली.महिलांचा उत्साह वाढविण्या साठी विविध खेळ व उपक्रम घेण्यात आले. तसेच प्रभाग संघा मार्फत ग्रामसंघांना सी आय एफ निधीचे वाटप करण्यात आले.

या सभेस प्रभागसंघाचे पदाधिकारी,सर्व ग्रामसखीताई,सर्व तालुका व्यवस्थापक, सर्व प्रभाग समन्व्यक तसेच तालुक्यातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.बैठकीचे औचित्य साधुन कृषी विभागा मार्फत स्टॉल लावुन १३२महिलांचे शेतकरी प्रमानपत्र काढण्या साठी ऑनलाईन अर्ज करण्यात आले.तसेच गटांतील महिलांनी स्वतः तयार केलेल्या वस्तु व खाद्य पदार्थांचे स्टॉल सुद्धा लावलेले होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय माले सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रभाग संघ कोषाध्यक्ष शितल कुलकर्णी यांनी केले.

# बुद्धिस्टडी, विपश्यना व ध्यानधारणेवर एकदिवसीय शिबिर

## शिरूरकासारच्या शासकीय निवासी शाळेत सेवा संकल्प अभियानांतर्गत उपक्रम; विद्यार्थ्यांना एकाग्रतेसाठी ध्यानधारणेचे मार्गदर्शन

मानूर ।प्रतिनिधी

अनु. जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, शिरूरकासार, जि. बीड येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रगती सेवाभावी संस्था व शासकीय निवासी शाळेच्या संयुक्त विद्यमाने बुद्धिस्टडी, विपश्यना व ध्यानधारणेवर एकदिवसीय शिबिर उत्साहात पार पडले. समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रदीप भोगले यांच्या मार्गदर्शनपर सूचनेनुसार या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरासाठी धम्मभूमी महाविहार, शिवणी, बीड येथील भंते बुद्ध बोधी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस. आर. सानप होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रगती सेवाभावी संस्था, पाडळीचे सचिव गणेश आवंतकर, पत्रकार चंद्रकांत राजहंस तसेच शाळेचे गृहपाल एस. एम. पाचे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी जगाला शांततेचा संदेश देणारे महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. भंते बुद्ध बोधी यांनी विद्यार्थ्यांना बुद्धिस्टडी, विपश्यना व ध्यानधारणेचे महत्त्व समजावून सांगत अभ्यासातील एकाग्रता वाढविण्यासाठी ध्यानधारणेची आवश्यकता स्पष्ट केली. आनापान ध्यानासाठी आवश्यक सूचना देत विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष ध्यानधारणेचा सराव करून घेण्यात आला.



मुख्याध्यापक एस. आर. सानप यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व विशद केले. प्रगती सेवाभावी संस्थेचे सचिव अनिल आवंतकर यांनी मनोगत व्यक्त केले, तर चंद्रकांत राजहंस यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी शाळेतील शिक्षक चाटे, शिरसाट, वाघमारे, शिंदे, श्रीमती निकाळजे तसेच प्रगती सेवाभावी संस्थेचे इतर सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विपश्यना साधक एस. के. फंड यांनी केले, तर आभार अशोक वाघमारे यांनी मानले. विद्यार्थ्यांच्या मानसिक एकाग्रतेसोबतच व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.हवे असल्यास यासाठी सकाळच्या शैलीतील आणखी आकर्षक मथळा आणि फोटो ओळही देऊ शकतो.



# पिंपरनई येथील शेतकऱ्याची शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील पिंपरनई येथील शेतकरी विक्रम बाबासाहेब दाभाडे (वय ४४ वर्षे) यांनी शनिवारी सकाळी आपल्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.विक्रम दाभाडे हे दररोज नित्यनेमाने दूध घालून तसेच शेतातील गाय बांधून घरी परतत असत. मात्र शनिवारी ते नेहमीच्या वेळेत घरी न परतल्याने त्यांची मुलगी साक्षी दाभाडे त्यांचा शोध घेण्यासाठी शेतात गेली. त्यावेळी विक्रम दाभाडे हे शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले.कुटुंबीयांच्या माहितीनुसार, दुष्काळी परिस्थिती आणि बँकेचे ३-४ लाख रुपये कर्ज मुलीच्या लग्नासाठी लागणाऱ्या आर्थिक खर्चामुळे विक्रम दाभाडे हे आर्थिक विवंचनेत होते. याच पार्श्वभूमीवर त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे त्यांच्या पत्नी अश्विनी दाभाडे यांनी ३-४ लाख रुपये बँक कर्ज असल्याचे सांगितले. त्यांचे शवविच्छेदन लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात झाले असुन पूढील तपास नेकनुर पोलिस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे करत आहेत.विक्रम दाभाडे यांच्या पश्चात पत्नी अश्विनी विक्रम दाभाडे, मुले प्रशांत (वय २२), सुशांत (वय २०)आणि मुलगी साक्षी (वय १८) तसेच वडील बाबासाहेब देवराव दाभाडेआणि आई सुंदरबाई बाबासाहेब दाभाडे असा परिवार आहे.दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि वाढता आर्थिक ताण यामुळे शेतकरी कुटुंबावर निर्माण होणाऱ्या संकटाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी म्हटले आहे. तसेच मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार तातडीने मदत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## किनवट येथे नगराध्यक्ष सौ. सुजाताताई एंड्रलवार यांच्या वाढदिवसानिमित्त

# ८ ऑक्टोबरला ह.भ.प. शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनाचे आयोजन

किनवट (प्रतिनिधी)

माजी जिल्हा परिषद सदस्या तथा किनवट नगरपालिकेच्या लोकनियुक्त विद्यमान नगराध्यक्ष सौ. सुजाताताई विनोद एंड्रलवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून किनवट शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप शिवलीला ताई पाटील यांच्या कीर्तनाचे आयोजन केले आहे या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना (उबाठा) पक्षाने केले आहे.



गुरुवारी, दि. ०८ ऑक्टोबर २०२६ रोज गुरुवारी सायं ७ ते १० या वेळेत संत श्री गजानन महाराज मंदिर मंगल कार्यालय, किनवट येथे हा सोहळा पार पडणार आहे.या सोहळ्यात महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा कीर्तनकार ह.भ.प. शिवलीलाताई पाटील आपल्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण शैलीत भक्तीमय कीर्तन सेवा सादर करतील. कीर्तन सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या बेबीताई नाईक राहणार असून, उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबादादा खराटे यांच्या हस्ते होणार आहे. विशेष अतिथी म्हणून कपिलभाऊ नाईक, माहूर नगरपंचायतचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, समाधान जाधव, उपनगराध्यक्ष हसन लाला, काँग्रेसचे नेते माधव रेड्डी सौ नंदिनीताई टारपे, प्रकाश गब्बा राठोड,जनाबाई डुडुळे यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनेचे नेते,स्थानिक नगरपालिकेचे सभापती, उपसभापती व सर्व नगरसेवक प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत.

या भक्तिमय सोहळ्याचे आयोजन शिवसेना शहरप्रमुख तथा स्वीकृत नगरसेवक प्रशांत सुरेशराव कोरडे यांच्या वतीने करण्यात आले आहे. तरी किनवट शहर व परिसरातील सर्व नागरिकांनी आणि भाविकांनी या कीर्तन सोहळ्यास उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेनेचे तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील माजी शहरप्रमुख संतोष येलचलवार,युवा सेना तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड तसेच युवानेते करण एंड्रलवार मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## जमाअत-ए-इस्लामी हिंद

# महाराष्ट्रकडून सीजेपीला पाठिंबा

## एसआयआर रद्द करण्याची आणि मतदार यादीतून वगळलेली नावे पुन्हा समाविष्ट करण्याची मागणी

परळी प्रीतीनिधी : जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी उगझ ला संघटनेचा पाठिंबा जाहीर केला असून, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेबाबत, मतदारांची नावे वगळली जाण्याबाबत आणि निवडणुकीतील गैरप्रकारांच्या आरोपांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी या प्रकरणी उत्तरदायित्व निश्चित करण्याची, मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची आणि निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता व पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली.

याबाबत अधिक स्पष्टपणे बोलताना मौलाना इलियास खान म्हणाले, मतदानाचा अधिकार हा लोकशाही प्रक्रियेतील जनसहभागाचा एक मूलभूत आधारस्तंभ आहे. मतदार यादीतून मतदारांची नावे वगळली जाणे आणि एसआयआर प्रक्रियेच्या



अंमलबजावणीबाबत उपस्थित झालेल्या शंकांचे पारदर्शकपणे निरसन होणे आवश्यक आहे. प्रत्येक पात्र मतदाराला आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करण्याची संधी मिळाली पाहिजे. तसेच, कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची कायदेशीर प्रक्रियेनुसार चौकशी केली गेली पाहिजे.

जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे अध्यक्ष पुढे म्हणाले, या चिंतांच्या पार्श्वभूमीवर जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी करते. तसेच, त्यांच्यावरील आरोपांची कायद्यानुसार चौकशी करण्यात यावी आणि जिथे आवश्यक असेल तिथे योग्य कायदेशीर कारवाई केली जावी. ज्या पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांची नावे पुन्हा समाविष्ट करण्यात यावीत, सुरू असलेली एसआयआर प्रक्रिया थांबवण्यात यावी आणि ज्या मतदारसंघांमध्ये विश्वासार्ह चौकशीतून निवडणुकीतील गैरप्रकार सिद्ध होतील, तिथे पुन्हा निवडणुका घेण्यात याव्यात, अशीही आमची मागणी आहे.

ते पुढे म्हणाले की, संघटना नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करण्याची तसेच प्रस्तावित राष्ट्रीय नागरिक नोंदणी , राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी आणि त्यासंबंधित इतर उपाययोजना रद्द करण्याचीही मागणी करते. डखठ प्रक्रियेबाबतच्या चिंताचा विचार नागरिकत्व, समानता आणि मतदानाचा अधिकार यांवर होणाऱ्या परिणामांच्या व्यापक संदर्भात केला गेला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राने निवडणूक प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायदेशीर प्रक्रियेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले असून, प्रत्येक पात्र नागरिकाच्या लोकशाही अधिकारांचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे.

# सर्व माध्यमांतील विद्यार्थी, शिक्षकांच्या प्रश्नांवर मंत्री अदिती तटकरे यांच्याशी चर्चा



मुंबई : महिला व बाल विकास मंत्री अदिती वरदा सुनील तटकरे यांची अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे भेट घेतली. यावेळी सर्व माध्यमांतील विद्यार्थी, शिक्षक व शाळांशी संबंधित विविध शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आवश्यक सुविधा, बालविकास व पूर्व-प्राथमिक शिक्षण, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक अडचणी तसेच शिक्षक व शाळांशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांकडे शिष्टमंडळाने मंत्री अदिती तटकरे यांचे लक्ष वेधले. तसेच या प्रश्नांवर आवश्यक उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली.यावेळी अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाचे संस्थापक साजिद निसार अहमद, माध्यमिक राज्य अध्यक्ष इरफान अन्सारी, राज्य कार्याध्यक्ष शौकत महाते, रायगड प्राथमिक जिल्हाध्यक्ष एकबाल कौचाली, नबील सय्यद यांच्यासह संघाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.सर्व माध्यमांतील विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांच्या शैक्षणिक हितासाठी संघाच्या वतीने विविध प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# चिखली बुलढाणा येथून अल्पवयीन पीडित मुलींची सुटका व आरोपीला घेतले ताब्यात

बीड(प्रतिनिधी):-पोलीस ठाणे पिंपळनेर गुन्हा रजिस्टर नंबर २७६/२०२५ कलम १३७ (२) बी एन एस २०२३ हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग झाला होता. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांनी सदर प्रकरणामध्ये मूळ फाइल चे अवलोकन केले. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांची भेट घेवून गुन्ह्या संदर्भाने चौकशी केली. माहितीच्या आधारे -क्ढण टीम बीड जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतला परंतु पीडित आणि आरोपी मिळून आले नाही. वेगवेगळ्या संशयित लोकांची चौकशी केली परंतु उपयुक्त माहिती मिळाली नाही तसेच कुटुंबीय माहिती लपवत असल्याचा संशय येत असल्याने गोपनीय बातमीदार यांना सक्रिय केले. त्यानंतर गोपनीय बातमीदारामार्फत अचूक माहिती प्राप्त झाली त्यानंतर सदर माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून गोपनीय माहितीच्या आधारे समजले की पिडीत व आरोपी हे चिखली बुलढाणा येथे वास्तव्यास आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाल्याने दिनांक ०२/१०/२०२६ रोजी -क्ढण टीम चिखली बुलढाणा कडे रवाना झाली. पोलीस ठाणे चिखली बुलढाणा येथे पोहचल्यावर येथील स्थानिक पोलीस यांच्या मदतीने गोपनीय बातमीदारामार्फत प्राप्त झालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन पीडित व आरोपी वास्तव्यास व काम करीत असलेल्या ठिकाणावरून त्यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाणे चिखली येथे हजर करून, पीडित व आरोपी यांना घेऊन टीम बीडकडे रवाना झाली. त्यानंतर पोलीस ठाणे पिंपळनेर येथे पोहोचून, पुढील कार्यवाही कामी पिडीत व आरोपीला पोस्टे ला हजर केले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, सहायक पोलीस उप




निरीक्षक उषा चौरे, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई भाऊसाहेब कारले, सर्व नेमणूक अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

# कॅप्टन स्मित मच्छार यांच्या शौर्याला जय हिंदची मानवंदना

## जय हिंद मंडळाचे प्रथम पारितोषिक कॅप्टन स्मित मच्छार यांच्या शौर्याला समर्पित

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरातील जय हिंद तरुण मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवात सादर केलेल्या भगवान विष्णू दशावतार या भव्य आणि भक्तिमय जिवंत देखाव्याला विचार भारती उत्कृष्ट देखावा स्पर्धेतील पौराणिक जिवंत देखावा विभागात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. मंडळाचे हे पारितोषिक शेकडो प्रवाशांचे प्राण वाचवणारे भारतीय वंशाचे शूर वैमानिक स्मित मच्छार यांना अर्पण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे, अशी माहिती जय हिंद तरुण मंडळाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक विपुल शेटीया यांनी दिली.

जय हिंद तरुण मंडळांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणेशोत्सवात आकर्षक पौराणिक दशावतार हा भव्य जिवंत देखावा सादर केला होता. आकर्षक, कलात्मक मांडणी, उत्कृष्ट






वेशभूषा, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रभावी सादरीकरणामुळे या देखाव्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विचार भारतीच्या परीक्षकांनी या देखाव्यास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिले आहे. मंडळाच्या या यशामध्ये सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, कलाकार, इव्हेंट मॅनेजमेंट टीम, साऊंड सिस्टीम तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे अथक परिश्रम असल्याच्या भावना मंडळाचे उपाध्यक्ष बाली ठाकूर यांनी व्यक्त केली.

शेकडो प्रवाशांचे जीव वाचविणाऱ्या या भारतमातेच्या वीर सुपुत्राला आमच्या महाविजयाफची ही छोटीशी मानवंदना आहे. हे पारितोषिक आम्ही कॅप्टन स्मित मच्छार यांच्या शौर्याला आणि कर्तव्यनिष्ठेला समर्पित करीत आहोत, अशी भावना जय हिंद तरुण मंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.या यशाबद्दल व सामाजिक जाणिवेचे जय हिंद तरुण मंडळाच्या सर्व पदाधिकारी, कलाकार, कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांचे परिसरातून अभिनंदन होत आहे. मंडळाचे अध्यक्ष, माजी नगरसेवक विपुल शेटिया, उपाध्यक्ष बाली ठाकूर, खजिनदार पिटू राठोड, सचिव गणेश होनावळे तसेच प्रशांत मुथा, संजय चांदेकर, विशाल शेटिया

# संत-महापुरुषांचे विचार विसरल्याने नैतिक अधःपतन : डॉ. श्रीपाल सबनीस

## कष्ट आणि वेदनांतूनच वास्तववादी साहित्य जन्माला येते : माजी आ. भीमराव धोंडे

साहित्याचा आणि बीड जिल्ह्याचा अत्यंत घनिष्ठ संबंध : संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. सतीश साळुंके

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

संत आणि महापुरुषांचे विचार आपण विसरत चालल्यामुळे समाजाचे मोठे नैतिक अध:पतन होत असून, याच नैतिक घसरणीमुळे आज लोकशाहीसमोरही आव्हाने निर्माण झाली आहेत, असा परखड इशारा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी दिला. कष्ट आणि वेदनांतूनच वास्तववादी साहित्य जन्माला येते. साहित्य हा समाजमनाचा आरसा असून शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांना साहित्याच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. तर साहित्याचा आणि बीड जिल्ह्याचा अत्यंत घनिष्ठ संबंध असून, वास्तव जगणाऱ्या आणि वाचनातून लिहिणाऱ्या साहित्यिकांचे साहित्यच चिरंतन टिकते, असे संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. सतीश साळुंके यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी आणि आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलना'चे कडा येथे उत्साहात आयोजन करण्यात आले. या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी शेतकरी, साहित्य आणि सामाजिक वास्तव यावर सखोल विचार मांडले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून आयोजित केले जाणारे हे राज्यातील पहिलेच शेतकरी साहित्य संमेलन असावे. राज्यात दुष्काळाचे सावट असताना या संमेलनाचे आयोजन अत्यंत समयोचित आहे. शेतकऱ्यांची मुले मंत्री-मुख्यमंत्री झाली, तरी बळीराजाच्या डोळ्यांतील अश्रू का थांबत नाहीत, हा प्रश्न गंभीर आहे. शेतकरी आत्महत्या, कर्जबाजारीपणा आणि पाण्याचा अभाव या समस्या आजही कायम आहेत. या दुर्दैवी अवस्थेला केवळ व्यवस्था नव्हे, तर सरकार आणि समाजही जबाबदार आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र आता पूर्वीसारखा राहिलेला नाही. त्यामुळे साहित्यिकांनी सजग राहून व्यवस्थेला जाब विचारला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. मराठवाड्याच्या भूमीने धार्मिक एकात्मतेचा आदर्श घालून दिला असून, समाजातील प्रश्न, समस्या, दुःख आणि वेदनांतून निर्माण होणारे साहित्य अधिक सकस आणि दीर्घायुषी ठरते. वरवरचे लेखन अल्पजीवी असते, त्यामुळे शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न आणि स्थानिक भवताल साहित्याचे मुख्य विषय झाले पाहिजेत, असेही त्यांनी नमूद केले.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांनी शेतकरी समस्यांवर भाष्य करताना सांगितले की, कष्ट आणि वेदनांतूनच वास्तववादी साहित्य जन्माला येते आणि साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली, तरी शेतकऱ्यांच्या पाण्याचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागाकडे वळवले पाहिजे. नदीजोड प्रकल्प केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात कधी सुरू होणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सरकारने शेतकऱ्यांना केवळ स्वप्ने न दाखवता योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी. जिथे दुःख आणि वेदना असतात, तिथेच साहित्य निर्माण होते. लेखक, कवी आणि साहित्यिक समाजाला चिंतनशील बनविण्याचे काम करतात. अचूक शब्दांत विचारांची मांडणी करणे हे साहित्यिकांचे कौशल्य असून, ते प्रत्येक लेखक-कवीने आत्मसात केले पाहिजे. शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून शेतकरी आणि त्यांच्या प्रश्नांवर शेतकऱ्यांच्या मुलांनीही साहित्यनिर्मिती करावी. रामायण-महाभारतासारख्या कथा आपण आजही वाचतो, ऐकतो आणि कथन करतो; त्याचप्रमाणे कृषी साहित्यही आवडीने वाचले गेले पाहिजे. त्यासाठी वाचनीय साहित्य निर्माण करणे ही नवोदित साहित्यिकांची जबाबदारी आहे. या साहित्य संमेलनातून प्रेरणा घेऊन नवीन साहित्यिक निर्माण झाले पाहिजेत. शिक्षक आणि प्राध्यापकांनीही साहित्य लेखन केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

संमेलनाध्यक्ष तथा राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक आणि साहित्यिक प्रा. डॉ. सतीश साळुंके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बीड जिल्ह्याचा समृद्ध ऐतिहासिक आणि साहित्यिक वारसा उलगडला. साहित्याचा आणि बीड जिल्ह्याचा अत्यंत



घनिष्ठ संबंध असल्याचे सांगताना त्यांनी मराठवाड्यातील प्राचीन साहित्यपरंपरेचा संदर्भ दिला. ज्या काळात कागदाचाही शोध लागला नव्हता, त्या सहाव्या शतकात मराठवाड्यात भूर्जपत्रावर साहित्यनिर्मिती झाली. राष्ट्रकूट, शालिवाहन आणि चालुक्य यांसारख्या राजवटींच्या काळात सापडलेले शिलालेख आणि ताम्रपट हे मराठी भाषेच्या विकासाचे जिवंत साक्षीदार आहेत, असे त्यांनी सांगितले. आज शेतकऱ्यांच्या घामाला रास्त मोल मिळत नाही. या वास्तवावर साहित्यिकांनी परखडपणे लिहिले पाहिजे. साहित्यिकांनी केवळ पारंपरिक चौकटीत न अडकता नवीन भाषा, नवे तंत्रज्ञान आणि आधुनिक संशोधन आत्मसात केले पाहिजे. प्रमाण भाषेचे अवडंबर न माजवता प्रत्येकाने आपल्याला भावणाऱ्या भाषेत निर्भयपणे व्यक्त झाले पाहिजे आणि साहित्यातील सांस्कृतिक दहशतवाद मोडून काढला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. साहित्याचे तथाकथित ठेकेदार आणि साहित्यात राजकारण करणाऱ्यांवरही त्यांनी भाष्य केले. जो वास्तव जगतो, वाचतो आणि त्यातून लिहितो, त्याचेच साहित्य चिरंतन टिकते. प्रश्न, समस्या, दुःख आणि वेदनांतून निर्माण होणारे साहित्य अधिक सकस असते. त्यामुळे शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न आणि स्थानिक भवताल साहित्याचे प्रमुख विषय झाले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

उद्घाटन समारंभापूर्वी कडा शहरातून उत्साहात ग्रंथदिंडी काढण्यात आली. त्यानंतर प्रा. अनंत हंबर्डे यांच्या हस्ते ग्रंथदालनाचे उद्घाटन करण्यात आले. मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी आनंद चॅरिटेबल संस्थेच्या अध्यक्षा सौ. दमयंतीताई धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे, अभय धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, साहित्य व संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष प्रदीप ढवळ, सदस्य श्रीधर नांदेडकर, महाराष्ट्र राज्याच्या मृद व जलसंधारण विभागाचे माजी सचिव सुनील चव्हाण, नदीजोड प्रकल्पाचे अभ्यासक डॉ. एम. डी. पाटील, प्रसिद्ध कथाकार व साहित्यिक भास्कर बडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाने यापूर्वी कडा येथे मराठवाडा साहित्य परिषदेचे साहित्य संमेलन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने जिल्हास्तरीय युवक महोत्सव आयोजित केल्याची माहिती दिली. महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन साहित्य व संस्कृती मंडळाने यावर्षी कडा येथे एकदिवसीय बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलनाची संधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी स्वागताध्यक्ष तथा महाराष्ट्र भूषण, शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे नमूद करून, या संमेलनाच्या प्रेरणेतून कडा-आष्टीसारख्या ग्रामीण भागातून अनेक नवीन साहित्यिक निर्माण होतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी धर्माचार्य ह.भ.प. आजिनाथ महाराज आंधळे, अशोक साळवे, सरपंच भीमराव पाटील, बाबूशेठ भंडारी, संतोषभैय्या चव्हाण, शंकर देशमुख, सुभाष पाटील निंबाळकर, प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्राचार्य शिवदास विधाते, माऊली बोडखे, संदीप नन्नवरे, संजय शेंडे, सागर वाघुले, इंजि. पी. बी. बोडखे, बबन औटे, कवी प्रा. सय्यद अलाउद्दीन, पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, पत्रकार उत्तम बोडखे, विठ्ठल लांडगे, श्याम भोजने, आसाराम थोरात गुरुजी, दादासाहेब हजारे, ठकाराम दुधावडे, दीपक किंबहुने, विठ्ठल जाधव, दिनकर जोशी, भाऊसाहेब गाडे, कवयित्री रीता जाधव यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शैलजा कुचेकर व प्रा. डॉ. बापू खैरे यांनी केले, तर डॉ. जी. पी. बोडखे यांनी आभार मानले. संमेलनाला परिसरातील शेतकरी, लेखक, साहित्यिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपळेश्वर इंग्लिश स्कूलमध्ये 'ग्रँडपेरेंट्स डे' उत्साहात

## चिमुकल्यांच्या शाळेत आजी-आजोबांचा उत्साह

आष्टी (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पिंपळेश्वर इंग्लिश स्कूल, आष्टी येथे विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांसाठी 'ग्रँडपेरेंट्स डे' अत्यंत उत्साहात, आनंदात आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. रोजच्या धावपळीतून वेळ काढून शाळेत एकत्र आलेल्या आजी-आजोबांनी नातवंडांसोबत विविध खेळांचा मनमुराद आनंद लुटत आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. या उपक्रमातून तीन पिढ्यांमधील प्रेम, आपुलकी आणि संस्कारांचे नाते अधिक घट्ट झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. किशोर नाना हंबर्डे यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुलभाताई किशोरनाना हंबर्डे होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी सौ. सरस्वती जाधव मॅडम यांची उपस्थिती लाभली. मान्यवर, पालक, आजी-आजोबा आणि शिक्षकांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.




यावेळी प्राचार्यांनी आपल्या मनोगतातून आजी-आजोबांचे मुलांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. आजी-आजोबा हे मुलांच्या आयुष्यातील संस्कार, प्रेम आणि अनुभवाचे मुख्य आधारस्तंभ असून, त्यांच्या सहवासातून मुलांना जीवनातील खरी मूल्ये, माणुसकी आणि नात्यांची जपणूक शिकायला मिळते, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विशेष 'वेलकम डान्स' सादर करून आजी-आजोबांचे उत्साहात स्वागत केले. त्यानंतर आजी-आजोबांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. तसेच सर्वांसाठी 'संगीत खुर्ची' स्पर्धा घेण्यात आली. वयाचे भान विसरून आजी-आजोबांनी या खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. नातवंडांसोबत खेळताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह उपस्थितांसाठी भावनिक क्षण ठरला. विविध स्पर्धांमधील विजेत्यांना छोटेखानी भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामीण भागात शेती, व्यवसाय आणि दैनंदिन कामांच्या व्यस्ततेमुळे अनेकदा आजी-आजोबा आणि नातवंडांना पुरेसा वेळ एकत्र घालवता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन शाळेने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे उपस्थित पालक व आजी-आजोबांनी मनापासून कौतुक केले. केवळ मनोरंजन हा या कार्यक्रमाचा उद्देश नसून, मुलांच्या मनात घरातील ज्येष्ठ व्यक्तींबद्दल आदर, प्रेम, कृतज्ञता आणि जिव्हाळा निर्माण व्हावा, तसेच कुटुंबातील संस्कार व नातेसंबंध अधिक दृढ व्हावेत, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.

नातवंडांसोबत वेळ घालवताना आजी-आजोबांनी बालपणाचा आनंद पुन्हा अनुभवला, तर विद्यार्थ्यांनाही आपल्या कुटुंबातील ज्येष्ठांच्या प्रेमाची आणि अनुभवाची नव्याने जाणीव झाली. त्यामुळे 'ग्रँडपेरेंट्स डे' हा केवळ शाळेतील एक कार्यक्रम न राहता प्रेम, संस्कार आणि कौटुंबिक बंधांना उजाळा देणारा संस्मरणीय सोहळा ठरला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पिंपळेश्वर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत आनंददायी, उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला.

# गाडेकर कुटूंबातील पहिली डॉक्टर !

## ईषा (राधा ) प्रशांत गाडेकर पहिल्या पांच टॉपर मधे परिक्षा उतिर्ण !

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील रहिवासी गाडेकर कुटूंबात पहिली डॉक्टर होण्याचा बहुमान ईषा (राधा ) प्रशांत गाडेकर हीने मिळवला असुन वैद्यकिय क्षेत्रातील अंतिम परिक्षेत प्रथम पांच टॉपर मधे यशस्वी ठरली असुन गाडेकर कुटूंबात ती पहिली डॉक्टर झाली आहे ,प्राथमीक ,माध्यमिक व वैद्यकिय अशा शैक्षणीक प्रवासात नापास हा शब्दस्पर्श होऊ दिला नाही .इशा (राधा ) गाडेकर ही प्राथमीक शिक्षक असलेल्या प्रशांत व आरती गाडेकर यांची मुलगी तर पत्रकार विजयकुमार गाडेकर यांची नात कुटूंबातील पहिली डॉक्टर बनली .कुटूंबात वेगवेगळ्या क्षेत्रापेक्षा वेगळी वाट निवडून मी डॉक्टर होणार हे उद्दिष्ट अखेर साध्य केले . या



यशाबद्दल तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असुन सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद गिरीजी व उत्तराधीकारी महंत विवेक महाराज शास्त्री यांचे सह कालिका देवी मंदिर विश्वस्त अध्यक्ष रोहिदास पाटील,विद्यमान नगराध्यक्षा प्रतिभा पाटील ,माजी नगराध्यक्षा मिरा गाडेकर ,गटनेते गणेश भांडेकर ,वृध्देश्वर कारखान्याचे संचालक दिपक पाटील ,खरवंडीचे सरपंच प्रदिप पाटील , प्रा.भालचंद्र भांडेकर , राजू डिमके , पत्रकार आदि स्नेहीजनाकडून कौतुक केले जात आहे .

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठीचा काँग्रेसचा आक्रोश मोर्चा पुढे ढकलला

## नवीन तारीख व वेळ लवकरच जाहीर होणार

जालना शेख फारुक :- दि.४ शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आक्रोश मोर्चा पुढे ढकलण्यात आला आहे. सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी नियोजित असलेला हा मोर्चा काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आला असून मोर्चाची नवीन तारीख आणि वेळ लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अशोक उबाळे यांनी दिली.

जिल्ह्यातील शेतकरी विविध समस्यांना सामोरे जात आहेत. पिकांचे नुकसान अपुरा पाऊस दुष्काळसदृश परिस्थिती तसेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसच्या वतीने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान मोर्चा पुढे ढकलण्यात आला असला तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेसची भूमिका कायम असून आगामी काळात हे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील असे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. नवीन तारीख व वेळ निश्चित झाल्यानंतर त्याची अधिकृत माहिती पक्षाच्या वतीने देण्यात येणार आहे.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत संत नारायण महाराज विद्यालयाच्या मुलींची बाजी

## अनेक विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

आष्टी (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत संत नारायण महाराज विद्यालय, महिंदा (ता. आष्टी, जि. बीड) येथील विद्यार्थिनींनी मैदानी क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. विविध वयोगटांतील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरावर अव्वल क्रमांक पटकावले असून, अनेक खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तालुका क्रीडा संकुल, हंबर्डे महाविद्यालय, आष्टी येथे पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये विद्यालयाच्या खेळाडूंनी विविध मैदानी क्रीडा प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सराव, मेहनत आणि मार्गदर्शक शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर विद्यार्थिनींनी आपले क्रीडा कौशल्य सिद्ध केले.विद्यालयाच्या भक्ती उद्धव दहिफळे हिने १४ वर्षे वयोगटातील उंच उडी प्रकारात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. दिव्या रामहरी दहिफळे हिने १९ वर्षे वयोगटातील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तालुक्यात



द्वितीय क्रमांक मिळविला. रेशमा आनंदा दहिफळे हिने १९ वर्षे वयोगटातील ३००० मीटर चालण्याच्या स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक, तर ४०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळविला.

त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरी कालिदास शेकडे हिने १७ वर्षे वयोगटातील उंच उडीमध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. राधिका अमोल दहिफळे हिने याच वयोगटातील उंच उडीमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. पूजा मल्हारी दहिफळे हिने १९ वर्षे वयोगटातील ३००० मीटर चालण्यात तृतीय, तर उंच उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. दीपाली दादासाहेब दहिफळे हिने १७ वर्षे वयोगटातील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावला.

या सर्व गुणवंत विद्यार्थिनींनी विविध क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. त्यांच्या या यशामुळे संत नारायण महाराज विद्यालय, महिंदा यांच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यशस्वी विद्यार्थिनींना विद्यालयातील शिक्षक व क्रीडा मार्गदर्शकांनी सातत्याने सराव व मार्गदर्शन केले. त्यांच्या या योगदानाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी तारकेश्वर गडाचे महंत श्री. आदिनाथ महाराज शास्त्री यांनी सर्व यशस्वी खेळाडूंना शुभाशीर्वाद देत त्यांना उज्ज्वल कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. विजयकुमार गोल्हार साहेब तसेच महिंदा, पांगरा लमाण तांडा आणि विठ्ठलवाडी येथील समस्त ग्रामस्थांनी गुणवंत क्रीडापटू विद्यार्थिनींचे विशेष अभिनंदन केले. जिल्हास्तरीय स्पर्धेतही या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करून विद्यालयाचा व परिसराचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.



# भगतसिंग जयंती निमित्त युवा छावा ग्रुपने केले जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेत भगतसिंग यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस युवा छावाग्रुप कुंबेफळ चे प्रमुख शेखर उध्दव थोरात,श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ,डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर यांनी पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. भगतसिंग यांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९०७ रोजी पंजाबराज्यातील लायलपूर जिल्ह्यातील बंगा गाव येथे झाला. आई विद्यावती व वडील किशनसिंग होते.भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी सशस्त्र लढा निवडला. नवजवान भारत सभा संघटनेची मार्च १९२६ साली स्थापना केली. डिसेंबर १९२८ मध्ये भगतसिंग व राजगुरू यांनी ब्रिटिश अधिकारी जॉन सॉन्डर्स याला ठार केले.दि.२३ मार्च १९३१रोजी भगतसिंग, राजगुरू,सुखदेव यांना फाशी देण्यात आली.ते स्वातंत्र्यासाठी व भारत भूमीसाठी हसत हसत फासावर गेले.अशी माहिती श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी दिली.अशा महान स्वातंत्र्यवीरांचे विचार आपण आत्मसात केले पाहिजेत.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री. संदिप मेघराज ठोंबरे सर,शिक्षक श्री. आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे सर,श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त युवा छावा ग्रुप कुंबेफळ ग्रुप कडून शाळेतील विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले विचार व्यक्त केले.प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना या ग्रुप कडून प्रथम, द्वितीय,तृतीय असे बक्षीस दिले.सहभागी विद्यार्थ्यांनाही शालेय उपयोगी साहित्य वाटप केले.या ग्रुप कडून शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले व समाधान व्यक्त केले.यावेळी इ.७ वी वर्गातील वैभवी दत्तात्रय घाडगे या विद्यार्थिनीने भगतसिंग बाबत सुंदर गीत गायले.या ग्रुपचे शेखर उध्दव थोरात,श्रीशांत काशिनाथ थोरात, ज्ञानेश्वर जगन्नाथ थोरात,स्वप्नील दीपक थोरात,विकास मधुकर थोरात,सिध्देश्वर पवार यांनी या वेळी कार्यक्रमाचे आयोजन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर यांनी केले.श्री. राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास शेखर उध्दव थोरात,श्रीशांत काशिनाथ थोरात, ज्ञानेश्वर जगन्नाथ थोरात,स्वप्नील दीपक थोरात,विकास मधुकर थोरात,सिध्देश्वर पवार, पीएमपोषण शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार,अनिता पवार, अंगणवाडी ताई उषाताई थोरात,सुनिता घाडगे,अश्विनी थोरात, दिपाली पटेकर आदी उपस्थित होते.